१०२ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• पुणे, शनिवार १६ नोव्हेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-६०, पाने-८, किंमत : ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 60, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 16 November, 2024 Page- 8 Price- Rs. 7/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## राज ठाकरेंची शिवतिर्थावरील सभा रद्द

**मुंबई** - प्रचाराच्या शेवटच्या आदल्या दिवशी म्हणजेच रविवार १७ नोव्हेंबर रोजी ऐतिहासिक शिवाजी पार्कच्या मैदानावर नियोजित सभा रद्द करत असल्याची घोषणा आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली. 'शिवाजी पार्कवर सभा घेण्याची रितसर परवानगी आम्हाला मिळालेली नाही. सभेच्या तयारीसाठी अवघा दीड दिवस उरला आहे. आमचे पदाधिकारी उमेदवार आपापल्या मतदारसंघांमध्ये प्रचारामध्ये गुंतलेले आहेत. त्यामुळे त्या सर्वांना सभेसाठी बोलावून त्यांचा वेळ वाया घालवणे योग्य नाही असे मला वाटले. म्हणून मी शिवाजी पार्कमधील सभा रद्द करत आहे. त्याऐवजी मी मुंबई आणि ठाण्यामध्ये फिरून प्रचार करणार आहे, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

# एकजुटीने राहा! पाकिस्तानवर तिरंगा फडकवू
# बटेंगे तो कटेंगे! फडणवीसांचे पूर्ण समर्थन

**उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' या घोषणेवरून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात वादंग उठला आहे. भाजपाचेच ज्येष्ठ नेते नितीन गडकरी आणि पंकजा मुंडे यांनी या घोषणेपासून स्वत:ला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. तर महायुतीचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी तर सुरुवातीपासून या घोषणेला उघड विरोध केला आहे. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घोषणेचे समर्थन केले. ते म्हणाले की, बटेंगे तो कटेंगे हा या देशाचा इतिहास आहे. आपण जर एकजुटीने राहिलो नाही, तर गुलाम बनू. परंतु एकजुटीने राहिलो तर काश्मीरच काय पाकिस्तानवरही तिरंगा फडकवू शकतो.**



■ मुंबई

**बटेंगे** तो कटेंगे या घोषणेवरून विरोधकांनी भाजपाला धारेवर धरले आहे. अशा प्रकारच्या घोषणा उत्तर प्रदेशमध्ये चालत असतील, पण महाराष्ट्रातील जनतेला ते मुळीच रुचणार नाही, अशी रोखठोक भूमिका अजित पवार यांनी प्रचारसभांमधून वारंवार मांडली आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांना या घोषणेबद्दल प्रश्न विचारण्यात आला, त्यावेळी फडणवीस या घोषणेचे समर्थन करताना म्हणाले की, हिंदू एकजुटीने राहिले नाहीत तर काय होते, हे फाळणीने आपल्याला दाखवून दिले आहे. देशाचा इतिहास सांगतो की, जेव्हा-जेव्हा विखुरले गेलो तेव्हा गुलाम बनलो. जात, राज्य, समाजामध्ये जेव्हा आपला देश विभागला गेला तेव्हा आपण गुलाम बनलो. समाज जातींमध्ये वाटला गेला, प्रांतात वाटला गेला. आपण विभागलो गेलो तर तुकडे पडतील. त्यामुळे हिंदूंच्या एकजुटीसाठी अशा प्रकारची घोषणा देणे यात काहीही गैर नाही. त्याहीपुढे जाऊन मी म्हणेन की, हिंदूंची जर एकजूट झाली तर आपण काश्मीरच नव्हे तर पाकिस्तानचा » पान ७ वर

### अजित पवारांना जनतेचा मूड समजायला थोडा वेळ लागेल

'बटेंगे तो कटेंगे'ला अजित पवार यांनी केलेल्या विरोधाबद्दल फडणवीस म्हणाले की, ते अशा विचारधारेसोबत राहिले आहेत की, जी धर्मनिरपेक्ष आणि हिंदूविरोधी आहे. परंतु स्वत:ला धर्मनिरपेक्ष म्हणणारे वास्तविक धर्मनिरपेक्ष नाहीत. त्यांच्यासाठी हिंदुत्वाला विरोध हीच धर्मनिरपेक्षता आहे. अजितदादांना जनतेचा मूड समजायला थोडा वेळ लागेल. ते एकतर जनतेच्या भावना ओळखू शकले नाहीत अथवा या वक्तव्याचा अर्थ समजू शकले नाहीत. अथवा त्यांना बोलताना काही तरी वेगळेच सांगायचे होते. 'बटेंगे तो कटेंगे'च्या घोषणेशी असहमत असण्यामागे या तीनपैकी एखादे कारण असू शकेल.






## थोडक्यात...

### आदिवासींचे योगदान महत्त्वपूर्ण राष्ट्रपतींनी व्यक्त केल्या भावना

**नवी दिल्ली** - भारताच्या जडणघडणीत आदिवासी समाजाचे योगदान महत्वाचे असून, भगवान बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात मोठी कामगिरी बजावली असल्याच्या भावना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केल्या आहेत. त्या काल भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्राला उद्देशून दिलेल्या संदेशात बोलत होत्या. यावेळी त्या म्हणाल्या की, देशाच्या परंपरेत आदिवासी समूहाचे योगदान महत्त्वाचे आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विमानात तांत्रिक बिघाड

**रांची** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विमानात तांत्रिक बिघाड झाल्याची घटना घडली. आज पंतप्रधान मोदी झारखंड दौऱ्यावर होते. पंतप्रधान मोदी एका विशेष विमानाने देवघर आणि त्यानंतर हेलिकॉप्टरने जमुईला गेले होते. परतीच्या प्रवासासाठी तैनात विमानात तांत्रिक बिघाड झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विमानात बिघाड झाल्याची ही पहिलीच घटना आहे. त्यांच्या विमानात नेमका काय बिघाड झाला, याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

### मॅच फिक्सिंग चित्रपटाला स्थगितीला नकार

**मुंबई** - मुंबई उच्च न्यायालयाने २००८ साली झालेल्या मालेगाव बॉम्बस्फोटाच्या घटनेवर आधारित 'मॅच फिक्सिंग द नेशन एट स्टेक' या चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. या प्रकरणातील एक आरोपी माजी सैनिक प्रसाद पुरोहित यांनी ही याचिका दाखल केली होती. या चित्रपटाचा मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी सुरू असलेल्या खटल्यावर, त्याचप्रमाणे माझ्या प्रतिष्ठेवर परिणाम होईल असे याचिकाकर्त्याचे म्हणणे होते. यावर आपली बाजू मांडताना चित्रपट निर्माते म्हणाले की, हा चित्रपट या घटनेवर नसून त्यावर आलेल्या एका पुस्तकावर आधारित आहे.




# आम्ही हे करू, आम्ही हे केले
## मनसेचा जाहीरनामा प्रकाशित

■ मुंबई

**राज्यातील** विधानसभा निवडणुकीसाठी मुख्य राजकीय पक्षांनी आपापले एकाहून अधिक जाहीरनामे जाहीर केल्यानंतर आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अध्यक्ष राज ठाकरे यांनी 'आम्ही हे करू' या मथळ्याखाली पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित केला. त्याचबरोबर पक्ष स्थापनेनंतर मागील सुमारे अठरा-एकोणीस वर्षांत केलेल्या कामांचा लेखाजोखा मांडणारी पुस्तिका 'आम्ही काय केलं?' या मथळ्याखाली प्रकाशित केली.

आतापर्यंत अनेकांनी तुम्हाला आम्ही हे करू, ते करू अशी आश्वासने दिली. त्यातली किती पाळली गेली हे दिसतेच आहे. वर्षानुवर्षे सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्या त्याच आहेत. विषयही तेच आहेत. या समस्या आपण कशा सोडवणार हे आजवर कोणी सांगितले नाही. आम्ही मात्र कसे करू, हेदेखील आमच्या जाहीरनाम्यात सांगितले आहे, असे राज ठाकरे म्हणाले.

मविआ आणि महायुतीने आपापल्या जाहीरनाम्यातून मोफत गोष्टींची उधळण केली आहे. त्यासंबंधी बोलताना राज ठाकरे म्हणाले की, राज्याच्या तिजोरीवर अनावश्यक बोजा न टाकता जर जनतेला काही देणार असाल तर मी त्याला भेट म्हणेन. पण तिजोरीवर बोजा टाकून जर काही देणार असाल तर मात्र ती लाच आहे, असेच मी म्हणेन. यावेळची विधानसभा निवडणूक ही अशा प्रकारची पहिली निवडणूक आहे. त्यामुळे निकाल काय लागेल, हे कोणालाही सांगता येणार नाही. काहीही होऊ शकते, असे राज ठाकरे पुढे म्हणाले.

## अखेर अमित शहांच्या बॅगेचीही तपासणी झाली

■ हिंगोली




**केंद्रीय** गृहमंत्री अमित शहा हे हिंगोलीत प्रचार सभेला जात असताना हिंगोली हेलिपॅडवर निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या बॅगेची तपासणी केली. काही दिवसांपूर्वी प्रचार सभेला जात असताना हेलिपॅडवरच उद्धव ठाकरे यांच्या बॅगेची तपासणी निवडणूक आयोगाच्या » पान ७ वर

## संघ ही दहशतवादी संघटना आहे! हुसेन दलवाई यांचे वादग्रस्त विधान

■ मुंबई

**राष्ट्रीय** स्वयंसेवक संघ ही एक दहशतवादी संघटना आहे, असे वादग्रस्त वक्तव्य काँग्रेसचे नेते हुसेन दलवाई यांनी केले.

दलवाई यांच्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ निर्माण झाली आहे. संघ हिंसा शिकवतो, मुलांना खोटे बोलणे, हिंसाचार शिकवतात जे पूर्णपणे चुकीचे आहे. त्यामुळे संघ ही धोकादायक संघटना आहे आणि मी त्याचे पुरावे देत आहे. जनसंघाच्या संस्थापकाची हत्या झाली. या हत्येचा तपास करण्यासाठी बलराज मधोक यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. तीन महिने मधोक यांनी सर्वत्र फिरून अहवाल तयार केला. पण अहवाल लपवून ठेवण्यात आला. त्यानंतर मधोक यांनी एक पुस्तक लिहिले, ज्यामध्ये त्यांनी या अहवालाबद्दल सर्व काही सांगितले.

## ओबीसींची एकगठ्ठा मते मिळणे कठीण
## अजित पवार यांचा भाजपावर निशाणा

■ मुंबई

**लोकसभा** निवडणुकीच्या वेळी भाजपाच्या 'अब की बार, चारसो पार' या घोषणेचा आम्हाला जबर फटका बसला. तशीच चूक आता विधानसभेच्या निवडणुकीत होऊ नये अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रात जातीच्या आधारे मतदान होत नाही आणि ओबीसी समाजाची एकगठ्ठा मते आम्हाला मिळणे कठीण आहे, असे परखड मत मांडत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी अप्रत्यक्षपणे भाजपाच्या धोरणांवर निशाणा साधला.

२०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी भाजपाने 'चारसो पार'चा नारा दिला. त्याचा वेगळा अर्थ विरोधकांनी



जनतेपर्यंत पोहोचवला. पूर्ण बहुमतासाठी २७५ जागांची आवश्यक असताना भाजपाला चारशे जागा कशासाठी हव्या आहेत, असा संशय विरोधकांनी लोकांच्या मनात निर्माण केला. संविधान बदलण्यासाठी, वंचित समाजाचे आरक्षण रद्द करण्यासाठी, देशाला हिंदू राष्ट्र घोषित करण्यासाठी भाजपाला चारशे जागा हव्या आहेत, असा चुकीचा संदेश विरोधकांनी जनतेमध्ये पसरवला. त्याचा फटका आम्हाला लोकसभेत बसला. आता 'बटेंगे तो कटेंगे' यासारख्या नाऱ्यामुळे तीच चूक आम्ही पुन्हा करत आहोत, असे मला वाटते. दुसऱ्या राज्याचा मुख्यमंत्री येथे येतो आणि काही घोषणा करतो, हे काही योग्य नाही. महाराष्ट्रात जाती-धर्माच्या आधारे मतदान होत नाही.

## लाडकी बहीण योजना राबवता महिलांवरील अत्याचाराचे काय?

■ पुणे

**सरकार** लाडकी बहीण योजनेचा मोठा गाजावाजा करीत आहे. दुसरीकडे महिलांवरील अत्याचारांमध्ये चिंताजनक वाढ होत आहे. त्यावर तुम्ही कधी बोलणार, असा सवाल शरद पवार यांनी केला. खडकवासला विधानसभा मतदारसंघातील मविआचे उमेदवार सचिन दोडके यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत ते बोलत होते.

राज्यात महिलांवरील अत्याचार वाढले आहेत. दर तासाला ५ महिलांवर अत्याचार होत आहेत. ६४ हजार मुली, महिला बेपत्ता आहेत. देशात सर्वात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत.

### शरद पवार यांचा महायुतीला सवाल

त्यामुळे राज्याला पुढे नेण्यासाठी महिलांचा सन्मान आणि शेतकऱ्याचे जीवनमान सुधारणे आवश्यक आहे. मात्र आजचे राज्यकर्ते त्याबाबत काहीच करत नाहीत, असे शरद पवार म्हणाले.

## मनोरंजन विश्वावर अंबानींचे वर्चस्व
## रिलायन्स-डिस्नेचे विलिनीकरण पूर्ण

■ मुंबई

**रिलायन्स** इंडस्ट्रीज लिमिटेड आणि वॉल्ट डिस्ने कंपनी यांच्या माध्यम क्षेत्रातील ७०,३५२ कोटी रुपयांचे विलिनीकरण पूर्ण झाल्याची घोषणा काल करण्यात आली. रिलायन्स इंडस्ट्रीजने कंपनीच्या विस्तारासाठी ११,५०० कोटी (१.४ अब्ज डॉलर) रुपयांची गुंतवणूक केली आहे. यामुळे मनोरंजन विश्वावर अंबानींचे राज्य असेल. रिलायन्स ही व्हायकॉम १८ मीडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि वॉल्ट डिस्ने यांच्या एकत्र येण्यामुळे माध्यम क्षेत्रात महाकाय कंपनी बनली असून, तब्बल १२० पेक्षा अधिक दूरचित्रवाणी वाहिन्या, तसेच डिस्ने




- हॉटस्टार आणि जिओ सिनेमा या दोन मोठ्या स्ट्रीमिंग सेवांचे यामुळे एकत्रिकरण झाले आहे. यामुळे सोनी, झी एंटरटेनमेंट, नेटफ्लिक्स आणि ॲमेझॉनला स्पर्धक म्हणून या मोठे आव्हान तयार झाले आहे.

## इस्त्रायलचे पंतप्रधान नेतन्याहूंना भ्रष्टाचाराच्या सुनावणीत दिलासा नाही

■ तेल अवीव

**इस्त्रायलचे** पंतप्रधान बेंजामीन नेतन्याहू यांनी आपल्यावरील भ्रष्टाचाराच्या खटल्यात जबाब नोंदविण्यासाठी मागितलेली मुदतवाढ देण्यास न्यायालयाने ठाम नकार दिला. त्यामुळे नेतन्याहू यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

नेतन्याहू यांनी हमास आणि लेबनॉनविरुध्द छेडलेल्या युध्दावरून विरोधक आक्रमक झाले आहेत. नेतन्याहू यांना पदावरून हटविण्याची मोहीम विरोधकांनी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर नेतन्याहू यांना आपल्याविरूध्द सुरू असलेला भ्रष्टाचाराचा खटला लांबणीवर टाकायचा होता. मात्र न्यायालयाने स्पष्ट शब्दात नेतन्याहू यांना खडे बोल सुनावले. हा खटला आधीच चार वर्षांहून अधिक काळ लांबला असून, पंतप्रधानांनी २ डिसेंबर रोजी आपली भूमिका मांडलीच पाहिजे, असे न्यायालयाने सुनावले.

पंतप्रधान नेतन्याहू यांच्यावर भ्रष्टाचार, लाचखोरी आणि गोपनीयतेचा भंग केल्याप्रकरणी तीन खटले एकाचवेळी सुरू आहेत.

## नितीन गडकरी यांचा काँग्रेसवर हल्लाबोल

■ गडचिरोली

**केंद्रीय** रस्ते परिवहन मंत्री व भाजपा नेते नितीन यांनी आज काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. गडचिरोली येथे महायुतीचे अहेरी विधानसभेचे उमेदवार धर्मरावबाबा आत्राम व गडचिरोली विधानसभेचे उमेदवार डॉ. मिलिंद नरोटे यांच्या प्रचारासाठी त्यांची सभा झाली.

नितीन गडकरी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेली राज्यघटना भाजपा बदलणार आहे, असा खोटा प्रचार कॉंग्रेस करत आहे. खरे तर काँग्रेसनेच अनेकदा घटनेची मोडतोड केली. परंतु लोकांना कन्व्हींस करता येत नाही, म्हणून संभ्रमित करण्याचा प्रयत्न काँग्रेस करत आहे. ते पुढे म्हणाले की,केशवानंद भारती खटल्यात घटनेची मुलभूत तत्त्व बदलता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. तरीही काँग्रेसने विरोधात प्रचार केला.

आम्ही घटना बदलणार नाही आणि ती कोणाला बदलूही देणार नाही. काँग्रेसने घटनेची ऐसीतैसी करुन १९७५ मध्ये आणीबाणी लादणाऱ्या काँग्रेसचा प्रचार म्हणजे 'उल्टा चोर कोतवाल को डांटे', असा हा प्रकार आहे.

आपल्या प्रयत्नामुळे इंडियन ऑईल देशात इथेनॉलचे चारशे पंप सुरू करणार आहे. भविष्यात पाईपलाईनने गॅस घरपोच मिळणार आहे. येणाऱ्या काही दिवसांत सर्वत्र इलेक्ट्रिक बसेस धावणार आहेत. देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरची करण्याचे भाजपाचे स्वप्न आहे.

## महायुतीचा जाहिरातीवर १५ दिवसांत ७०० कोटी खर्च!

■ यवतमाळ

**महायुतीने** योजनांच्या जाहिरातीवर १५ दिवसात ७०० कोटींचा खर्च केला असा आरोप शरदचंद्र पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी केला. अमोल कोल्हे यांनी यवतमाळच्या पुसद येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार शरद मैंद यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. या सभेत त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महायुती सरकारवर टीका केली. कोल्हे म्हणाले की, गद्दारीचा काळा डाग हा गुलाबी रंगाने कधीच झाकला जाऊ शकत नाही, ही काळ्या

### अमोल कोल्हेंचा आरोप

दगडावरची रेघ आहे. पंतप्रधान मोदी यांनी सभेत ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचारवर बोलले आणि गुलाबी जॅकेटवाले पवार साहेबांचे बोट सोडून भाजपाच्या मांडीवर जाऊन बसले.

ते पुढे म्हणाले की, तुमच्यासाठी वेगवेगळ्या योजना आणल्या असे दाखविले जात आहे. पण या योजनांच्या जाहिरांतीवर १५ दिवसात ७०० कोटी रुपये खर्च केले आहेत. आता कळू न देता दहा हाताने सामान्य नागरिकांच्या खिशातून हे पैसे



काढण्याचे काम सुरू आहे. योजना दाखवून दहा हाताने खिशातून पैसे काढत आहे, असे हे सरकार आहे. प्रत्येक गोष्टीवर जीएसटी लावत आहे. महायुती फक्त विकासाच्या गप्पा मारणार आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या पाहून ७१ हजार कोटींची कर्ज माफी पवारसाहेबांनी केली.

# मणिपूरमध्ये पुन्हा 'लष्कर राज' 'अफ्स्पा' कायदा पुन्हा लागू

■ इम्फाळ

**गेले** सुमारे वर्ष दीड वर्षे जातीय हिंसाचाराच्या वणव्यात होरपळत असलेल्या मणिपूरमध्ये लष्कराला विशेषाधिकार देणारा वादग्रस्त अफ्स्पा कायदा पुन्हा लागू करण्यात आला आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने यासंबंधीची अधिसूचना जारी केली आहे. त्यानुसार राज्यातील सहा पोलीस ठाण्यांची हद्द अशांत टापू घोषित करण्यात आला असून, या ठिकाणी अफ्स्पा कायदा पुन्हा लागू करण्यात आला आहे.

सेकमई, लामसंग, लामाई, जिरीबाम, लेईमाखोंग आणि मोईरंग या सहा पोलीस ठाण्यांच्या हद्दींमध्ये १ ऑक्टोबरपासून पूर्वलक्षी प्रभावाने अफ्स्पा कायदा लागू झाला आहे.

# भारताच्या गाइडेड पिनाका रॉकेट प्रणालीची उड्डाण चाचणी यशस्वी

■ हैदराबाद

**संरक्षण** संशोधन आणि विकास संस्थेने गाइडेड पिनाका रॉकेट प्रणालीची यशस्वी उड्डाण चाचणी केली. ही चाचणी प्रोव्हिजनल स्टाफ क्वालिटेटिव्ह रिक्वायरमेंट्सअंतर्गत घेण्यात आली. वेगवेगळ्या फायरिंग रेंजवर ३ टप्प्यांत चाचणी पूर्ण झाली.

यादरम्यान रॉकेटची मारक क्षमता, अचूकता आणि स्थिरता तपासण्यात आली. भारतीय सैन्यात गाइडेड पिनाका वेपन सिस्टिमचा समावेश होण्यापूर्वीचा हा शेवटचा टप्पा होता. या चाचणीत रॉकेटची श्रेणी, अचूकता, स्थिरता आणि एकाच वेळी अनेक



लक्ष्यांवर हल्ला करण्याची क्षमता तपासण्यात आली. या चाचणीबाबत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ आणि भारतीय सैन्याचे अभिनंदन केले.

देश विदेश

# सर्वोच्च न्यायालयात प्रवेश नाकारलेल्या व्यक्तीने स्वत:ला बॉम्बने उडवले

■ साओपाऊलो

**ब्राझीलमध्ये** एक भयंकर घटना घडली आहे. एका व्यक्तीला सर्वोच्च न्यायालयात प्रवेश नाकारल्याने न्यायालयाच्या बाहेर स्वतःला बॉम्बने उडवले. या घटनेमुळे सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात खळबळ माजली.

ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, न्यायालयाचे कामकाज संपल्यानंतर सायंकाळी साडेसातच्या सुमारास दोन मोठे स्फोट ऐकू आले. या स्फोटानंतर न्यायालय परिसरात खळबळ माजली. न्यायालयातील सर्व न्यायाधीश आणि कर्मचारी सुरक्षितपणे इमारतीतून बाहेर पडले. त्यानंतर अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. या घटनेत स्वतःला बॉम्बस्फोटात उडवणाऱ्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला होता. मात्र त्याने अगोदर संसदेच्या पार्किंगमध्ये बॉम्बस्फोट केला होता.

# कॅनडा देश आमचा आहे आम्ही इथले मालक आहोत

■ ओटावा

**खलिस्तान समर्थकांचा दावा**

**भारत** आणि कॅनडा यांच्यातील संबंध बिघडलेले असतानाच आता खलिस्तानी समर्थकांनी कॅनडावर दावा केला आहे. कॅनडा आमचा आहे. त्यामुळे इथल्या गोऱ्यांनी इंग्लंड किंवा अन्य युरोपीयन देशात जावे अशा घोषणा दिल्या जात आहेत.

कॅनडाच्या रस्त्यावर 'नगर किर्तन' या कार्यक्रमाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यामध्ये जमलेले लोक खालिस्तान झिंदाबादच्या घोषणा देत असल्याचे दिसत आहे. कॅनडा आमचा आहे. आम्ही या देशाचे खरे मालक आहोत. इथे राहणारे युरोपीयन हे आक्रमणकारी आहेत. त्यामुळे गोऱ्या लोकांनी कॅनडा सोडून युरोप किंवा अन्य युरोपीयन देशात जावे. ४ लाखांहून अधिक लोकांनी हा व्हिडिओ पाहिला आहे आणि त्यांनी नाराजीही व्यक्त केली आहे.



# कार्तिकी पौर्णिमेनिमित्त लाखोंनी गंगास्नान केले

■ ऋषिकेश

**उत्तर** भारतातील विविध शहरांमध्ये आज कार्तिकी पौर्णिमेनिमित्त लाखो भाविकांनी गंगा व शरयू नदीत स्नान केले. आज सकाळपासूनच उत्तर भारतातील गंगानदीच्या किनाऱ्यांवरील शहरांमध्ये लाखो भाविकांची उपस्थिती होती.

कार्तिकी पौर्णिमेच्या पर्वात गंगा स्नानाला मोठे महत्त्व असते. त्यामुळे आज वाराणसी, ऋषिकेश, प्रयागराज या ठिकाणी लोकांनी एकच गर्दी केली. अनेक मंदिरांमध्येही भाविकांची गर्दी होती. सर्वत्र मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आज पहाटे साडेचार वाजल्यापासून सुरू झालेले कार्तिक पौर्णिमेचे पर्व उद्या पहाटेपर्यंत आहे. वाराणसीत या निमित्ताने चौदाकोसी व पंचकोसी प्रदक्षिणाही करण्यात आली. विविध मंदिरात विशेष श्रीरामचरित मानस व भागवत कथापुराणांचे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले होते. अयोध्येतही शरयू नदीवर भाविकांची मोठी गर्दी जमली होती.

# बिहारमध्ये विषारी दारुचे तीन बळी

■ पाटणा

**बिहारमधील** पाटणाजवळच्या सीवानमध्ये विषारी दारुमुळे तिघांचा बळी गेला असून, काहीजण गंभीर आजारी आहेत. या घटनेमुळे जिल्ह्यात एकच गोंधळ माजला आहे. सीवान मध्ये काल तिघेजण पन्नास रुपयात मिळणारी दारू पिऊन घरी आले. त्यांना त्यानंतर अस्वस्थ वाटू लागले. त्यांची दृष्टीही गेली. त्यानंतर आज सकाळी त्यांना रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. काही जणांना पाटणाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, या प्रकरणाचा तपास केला जात असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली.

# बांगलादेश सरकार संविधानातून सेक्युलर शब्द हटविण्याच्या तयारीत

■ ढाका

**बांगलादेशात** ९० टक्के मुस्लीम आहेत. त्यामुळे संविधानातून सेक्युलर शब्द हटविण्याची तयारी सुरू आहे. बांगलादेशचे ॲटर्नी जनरल मोहम्मद अल मुज्जमान यांनी बांगलादेशच्या संविधानात थोडा बदल करण्याची मागणी केली होती. त्याला काळजीवाहू सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

बांगलादेशात हिंसक आंदोलन सुरू झाल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान शेख हसिना यांना देश सोडून जावे लागले होते. त्यानंतर युनूस यांचे काळजीवाहू सरकार सत्तेवर आले. मात्र या सरकारमध्ये कट्टरपंथीयांचा समावेश असल्याने त्यांना शेख हसिनांच्या काळातील काही कायदे बदलायचे आहेत. त्यांची ही मागणी न्यायमूर्ती फसह महबुब आणि देवाशीस रॉय चौधरी यांच्या पीठासमोर १५ दुरुस्त्यांच्या वैधतेच्या सुनावणीत युक्तिवाद करताना ९० टक्के मुस्लीम आहेत. त्या देशाच्या संविधानात सेक्युलर शब्द कशासाठी असा सवाल केला होता.

# स्पेनमध्ये वृद्धाश्रमाला आग दहा जणांचा होरपळून मृत्यू

■ माद्रीद

**स्पेनमधील** वालाफ्रान्का दि इब्रो शहरातील एका वृद्धाश्रमाला आज सकाळी आग लागली. या आगीत दहा वृद्धांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या वृद्धाश्रमात एकूण ८२ वृद्ध राहत होते. त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. स्पेनच्या ईशान्येकडील शहरातील या वृद्धाश्रमातील एका खोलीतील गादीला प्रथम आग लागली व नंतर ती इतर खोल्यांमध्ये पसरली. आगीमुळे इमारतीचे नुकसान झाले नाही. मात्र अनेकांचा मृत्यू धुराने गुदमरल्यामुळे झाल्याचे अग्निशमन दलाने म्हटले आहे. या धुरामुळे मदतकार्यातही अडथळे आले. दुर्घटनेत जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यातील अनेकांची प्रकृती गंभीर आहे.



घाटकोपर पूर्व विधानसभा मतदारसंघात भाजपा महायुतीचे उमेदवार पराग शहा यांच्या प्रचारासाठी माता रमाबाई आंबेडकर नगर येथे रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वात भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे गौतम सोनवणे चिंतामण गांगुर्डे, डी. एम. चव्हाण, शिवसेनेचे परमेश्वर कदम आदी उपस्थित होते.

# अडीच वर्षांत मविआ सरकारकडून फक्त विकासाच्या प्रकल्पांना स्थगिती

■ पनवेल

**अडीच** वर्षांच्या काळात महाविकास आघाडीचे सरकारने फक्त विकासाच्या प्रकल्पांना स्थगिती देण्याशिवाय दुसरे कोणतेही काम केले नाही, मात्र महायुतीच्या सरकारने विविध जनकल्याणकारी योजना राबवून जनतेला दिलासा दिला त्यांना विकासाच्या दिशेने नेले, त्यामुळे राज्य हितासाठी आणि महाराष्ट्राच्या भवितव्यासाठी भाजपा महायुतीला मतदान करा, असे आवाहन भाजप महायुतीचे पनवेल मतदारसंघाचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर परिसरात झालेल्या प्रचार रॅलीवेळी केले.

पनवेल मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचाराला जोरदार वेग आला आहे. महायुतीचे पदाधिकारी प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचून कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या विकासकामांची माहिती देत त्यांना येत्या निवडणुकीत कमळासमोरील बटन दाबून भरघोस मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन करत आहेत. त्याअंतर्गत खारघर आणि तळोजामध्ये भव्य प्रचार रॅली झाली. या रॅलीला जनतेचा प्रचंड प्रतिसाद लाभला. युवा, तरुणदेखील मोठ्या संख्येने बाईक रॅलीत सहभागी होता.

या रॅलीत आमदार प्रशांत ठाकूर यांचा जयघोष करून विजयी करण्याचे आवाहन केले. या रॅलीत भाजपचे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक हरेश केणी, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भाजपचे पनवले शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, वासुदेव घरत, सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष उमेश चौधरी, प्रभाकर जोशी, विनोद घरत, मन्सूर पटेल, निर्दोष केणी, महिला मोर्चाच्या खारघर शहर अध्यक्षा साधना पवार,, विनोद घरत, सचिन वास्कर, जयदास तेलवणे, प्रल्हाद गायकर, जगदीश घरत, इर्शाद शेख, साजीद पटेल, जिशाद पटेल, संतोष पाटील, संतोष भोईर, जया घरत, संतोष घरत, रवी घरत, हरिश्चंद्र जोशी, प्रविण घरत, प्रल्हाद गायकर, रोहित पाटील, जगदीश घरत, विशाल घरत, अनिरुद्ध जोशी, विशाल जोशी, संदीप वास्कर, रणजीत घरत, गणेश जोशी, दिलीप कडू, तेजस पाटील, माणिक म्हात्रे, प्रभाकर खांदेकर, विवेक जोशी, मच्छींद्र कोळी, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी, शुभ पाटील यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# हिंगोलीत जीप-ट्रॉली अपघातात देवदर्शनास निघालेले १३ जखमी

■ हिंगोली

औंढा तालुक्यातील कळमनुरी ते पुसद रस्त्यावर भाविकांच्या जीपला झालेल्या अपघातात १३ जण जखमी झाले आहेत. औंढा तालुक्यातील राजदरी, पिंपळदरी येथील भाविक वर्धा येथील टाकळघाट येथे देवदर्शनासाठी जात होते.आज पहाटे कळमनुरी-पुसद रस्त्यावर झरा फाटा येथे भाविकांची क्रुझर जीप रस्त्यावर उभ्या असलेल्या उसाच्या ट्रॉलीला धडकली. यामुळे जीपमधील १३ जण जखमी झाले. ७ जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यातील तिघांना नांदेड व चार रुग्णांना हिंगोली येथे उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. उर्वरित सहा रुग्णांवर कळमनुरी येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉक्टर आनंद मेने यांनी दिली.

# मुंबई महापालिकेतील २० हजार सफाई कामगार लाभांपासून वंचित

**दि म्युनिसिपल युनियनची पालिका आयुक्तांकडे तक्रार**

■ मुंबई

**राज्य** शासनाच्या निर्णयानुसार सफाई कामगारांच्या व्याख्येत येत असलेल्या मुंबई महापालिकेतील विविध खात्यांतील सर्व सफाई कामगारांना लाड-पागे समितीच्या शिफारसी लागू कराव्यात, अशी मागणी दि म्युनिसिपल युनियनने केली आहे. महापालिकेच्या प्रचलित धोरणामुळे पालिकेतील विविध खात्यांतील सुमारे १५ ते २० हजार कामगार हे देय असलेल्या लाभांपासून वंचित ठेवले असल्याची तक्रार युनियनने पत्राद्वारे पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.

लाभांपासून वंचित ठेवलेल्या या कामगारांमध्ये महापालिकेच्या मलनिस्सारण, बाजार खात्यातील कामगार, पालिका रुग्णालयांतील आया, वॉर्डबॉय, शवविच्छेदन गृहातील कामगार, स्मशानभूमी कामगार तसेच देवनार पशुवधगृहातील कामगारांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर युनियनने मागणी केली आहे की, सुधारित आदेशानुसार विशिष्ट जाती अनुसूचित जाती प्रवर्गातील सफाई कामगारांना लाड पागे समितीच्या शिफारसी सुरू ठेवाव्यात. मुंबई महापालिकेच्या विविध खात्यांत या प्रवर्गातील ज्या कामगारांना वंचित ठेवले आहे, त्यांनाही हे लाभ पूर्वलक्षी प्रभावाने द्यावेत.

# दक्षिण पुण्यामध्ये आज पाणीपुरवठा बंद राहणार

■ पुणे

**पुण्याच्या** पद्मावती परिसरातील मुख्य जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठी दक्षिण पुण्यात उद्या पाणीपुरवठा बंद राहणार आहे. रविवारी सकाळी उशिरा कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. पर्वती एचएलआर गोल टाकीवरून पद्मावती पम्पिंग स्टेशनला येणाऱ्या १००० मिलिमीटर व्यासाच्या मुख्य जलवाहिनीत पद्मावतीमधील अवंती सोसायटीजवळ गळती सुरू झाली आहे. या दुरुस्तीसाठी सेमिनरी टाकी, बिबवेवाडी टाकी, तळजाई टाकी, अप्पर इंदिरानगर पम्पिंग स्टेशन येथील पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

# मुंबईत विविध शाळांमधून मतदान जनजागृती सुरू

■ मुंबई

**गेल्या** काही दिवसांपासून मुंबईतील विविध शाळांमध्ये स्विप पथकाच्या माध्यमातून मतदान जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम राबवले जात आहेत. अणुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघातील शाळांमध्ये काल बाल दिनाचे औचित्य साधत स्विपने अशीच मतदान जनजागृती केली. स्विप पथकाच्या माध्यमातून केंद्रीय निरीक्षक डॉ. हिरालाल पटेल (आयएएस) यांच्या मार्गदर्शनाखाली मानखुर्द शाळा, पदुआ शाळा, देवी एकविरा शाळा, हशु अडवाणी शाळा आदी शाळांमध्ये विविध उपक्रम राबवून मतदान जनजागृती केली. यावेळी १७२ स्विप पथकाच्या नोडल अधिकारी मेघा यादव यांच्या उपस्थितीत नृत्य, नाटक, गाणे, मानवी साखळी असे विविध कार्यक्रम करण्यात आले.

# तुतारीला पुन्हा ट्रम्पेटचा फटका बसणार?

■ मुंबई

**लोकसभा** निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा तुतारीला ट्रम्पेटचा फटका बसण्याची शक्यता आहे. शरद पवारांना लोकसभा निवडणुकीत तुतारीचे साधर्म्य असणाऱ्या निवडणूक चिन्हामुळे नुकसान झाले होते.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शरद पवार यांच्या नेतृत्वातील गटाला तुतारी वाजवणारा माणूस हे निवडणूक चिन्ह मिळाले. निवडणूक आयोगाने काही अपक्ष उमेदवारांना ट्रम्पेट चिन्ह दिले आहे. त्यापैकी ७८ मतदारसंघांत शरद पवार गटाचे उमेदवार आहेत. राज्यातील २८८ मतदारसंघांपैकी ५० जागांवर तुतारी आणि ट्रम्पेट या दोन्ही चिन्हांचे उमेदवार मैदानात आहेत. त्यामुळे शरद पवार गटाला फटका बसू शकतो.

कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांच्याविरोधात रोहित चंद्रकांत पवार हे अपक्ष उमेदवार ट्रम्पेट चिन्हासह निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यामुळे आमदार रोहित पवार यांना नाव आणि चिन्हामुळे मतविभाजनाचा फटका बसण्याची शक्यता आहे. सांगलीतील तासगाव-कवठे-महांकाळमध्ये शरद पवार गटाचे रोहित पाटील यांच्या विरोधात ३ रोहित पाटील निवडणुकीच्या मैदानात आहेत.

# भंडाऱ्यात रेल्वेच्या धडकेत वाघीण गंभीर जखमी

भंडारा- **भंडाऱ्याच्या** नाकाडोंगरी वनक्षेत्रातील पवनार खारी परिसरात रेल्वेची जोरदार धडक बसल्याने आज पहाटे एक वाघीण गंभीर जखमी झाली. या धडकेत वाघिणीची शेपटी तुटली असून, पायालादेखील गंभीर मार लागला. परिणामी या वाघिणीला कायमचे अपंगत्व येण्याची दाट शक्यता आहे. चंद्रपूर, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यांत रेल्वेचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आहे. अनेक रेल्वे मार्ग जंगलाला लागून आणि काही जंगलाच्या हद्दीतून जातात. त्यामुळे अनेकदा वन्यप्राणी रेल्वेची धडक लागून जखमी होतात.

# ८० टक्के मतदान करणाऱ्या सोसायटीला पुरस्कार देणार

**ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनची योजना**

■ ठाणे

**ठाण्यातील** गृहनिर्माण सोसायट्यांनी १०० टक्के मतदान व्हावे, या अपेक्षेने मतटक्का वाढवा आणि पुरस्कार मिळवा अशी अभिनव स्पर्धा आयोजित केली आहे, अशी माहिती ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे यांनी दिली. या उपक्रमात ८० टक्के आणि त्यापेक्षा जास्त मतदान करणाऱ्या सोसायट्यांना ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

या अभिनव स्पर्धेतील ज्या गृहनिर्माण सोसायटीत ८० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान होईल, त्या सोसायट्यांनी निर्धारित मतदान केल्याच्या विहित पुराव्यासह ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनच्या शिवाजी पथ येथील कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन सीताराम राणे यांनी केले आहे.दरम्यान, जिल्हा निवडणूक कार्यालयाच्या सूचनेनुसार नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील १५० ऐरोली व १५१ बेलापूर या दोन्ही विधानसभा मतदारसंघांत मतदानाची सामूहिक शपथ घेण्याचा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥



# वाढत्या सागरी धोक्यांवरचे नवे उपाय

भारताची भौगोलिक रचना अत्यंत अभिमानास्पद आहे. देशाच्या तीनही बाजूला विस्तीर्ण समुद्र किनारा आणि पूर्व भागात उंचच उंच पर्वतांच्या रांगा. असा हा सगळा भारताचा सीमावर्ती प्रदेश बघितल्यानंतर त्याच्या सुरक्षिततेचे तितकेच बहुआयामी प्रयत्न गरजेचे ठरतात. जगातील सर्वच देशांमध्ये भूदल, नौदल, हवाईदल या तीन प्रमुख संरक्षण दलांची आवश्यकता असते. परंतु भारताच्या तीनही भागातल्या सीमा बघितल्या तर जवळपास २७ हजार किलोमीटरचे सागरी किनारे सुरक्षेच्यादृष्टीने खूप महत्वाचे ठरतात म्हणूनच नौदलाबरोबरच स्वतंत्र तटरक्षक दलाचीदेखील तितकीच मोठी मदत भारताला घ्यावी लागते. कारण याच भागातून समुद्री घुसखोरी , दहशतवादी कारवाया, तस्करी, यासारखे प्रकार होतात. या सर्वांवर नजर ठेवण्याचे काम नौदलाला करावे लागतेच परंतु डोळ्यात अधिक तेल घालून त्याच्यावर पाहारा ठेवणेदेखील गरजेचे ठरते आणि म्हणूनच नौदलालासुद्धा प्रामुख्याने समुद्री चाचेगिरी किंवा दहशतवादी हालचालींवर लक्ष ठेवण्याकरीता त्यांच्याच अंतर्गत सागरी प्रहरी बल तैनात करावे लागते. अलिकडेच पश्चिम नौदल विभागाने यासाठी जवळपास ३९ नौका तैनात केल्या आहेत. त्यामध्ये जवळपास १ हजार ९ सैनिक चोवीस तास सज्ज राहाणार आहेत. मुंबईतल्या कुलाबा येथे आयएनएस आंग्रे असे संयुक्त मोहीम केंद्र उभारले गेले आहे. एकट्या पश्चिम किनारपट्टीचा जरी विचार केला तरी अरबी समुद्रात रोज अडीच हजार व्यापारी जहाजं आणि साडेतीन लाख मच्छिमार नौकांची ये जा सुरू असते म्हणजे इतका विस्तीर्ण समुद्रकिनारा या समुद्रात चालणाऱ्या व्यापारी स्वरूपाच्या आणि मच्छिमारी स्वरूपाच्या हालचाली लक्षात घेतल्या तर या किनारपट्टीवर सतत लक्ष ठेवणे किती गरजेचे आहे हे स्पष्ट होते. या दृष्टीकोनातूनच किनारपट्टीच्या या सुरक्षेसाठी समुद्र कसरती, आयोजित केल्या गेल्या आहेत. ज्याला सी व्हिजील हे नाव दिले गेले आहे.

### वाढता समुद्री व्यापार

मुंबईच्याच समुद्रकिनाऱ्यावर सुरक्षिततेच्या उपायांची रंगीत तालिम २० आणि २१ नोव्हेंबरला होत आहे. विशेष म्हणजे यंदा प्रथमच राष्ट्रीय सुरक्षा परिषद म्हणजे नॅशनल सिक्युरीटी कौन्सिल सहभागी होते आहे. म्हणजे एकीकडे मुंबईत होणारी परिषद आणि नौदलाने नव्याने अस्तित्वात आणलेले सागरप्रहरी बल या नव्या मोहीमा लक्षात घेतल्या. भारताची सागरी सुरक्षितता किती महत्वपूर्ण टप्प्यात येऊन पोहचते आहे हे सिद्ध होते. याची दोन महत्त्वाची कारणे आहेत. एक म्हणजे भारताच्या समुद्री व्यापार आणि व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होते आहे. अगदी देशाच्या अंतर्गत जलवाहतुकीसाठीसुद्धा गेल्या दहा वर्षापासून अनेक नव्या योजना सुरू झाल्या आहेत. म्हणजे पश्चिम बंगालपासून ते कर्नाटक, गोवा मुंबईपर्यंत अनेक प्रकारच्या वस्तूंची किंवा मालाची वाहतूक सुरू झाली आहे. जे रस्ते वाहतुकीपेक्षा स्वस्त आणि जलद होऊ शकते. म्हणजे व्यापार व्यवसायाचे हे वाढते प्रमाण लक्षात घेता त्यावर त्याला अडथळा येऊ नये किंवा समुद्री चाचे, दहशतवादी यांच्याकडून धोका पोहचू नये म्हणून आणि या सगळ्या वाढत्या व्यापारातून तस्करी होऊ नये. या सर्व गैरप्रकारांवर तितक्याच काटेकोरपणे लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. पाकिस्तान, चीन, बांगलादेश , श्रीलंका यासारख्या देशातूनही या समुद्र किनाऱ्यांचा गैरवापर होऊ शकतो. किंबहुना अनेकवेळा झालेला आहे. मग अगदी २६/११ चा मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला किंवा १९९३ साली झालेले बारा बॉंबस्फोट हे याच सागरी सुरक्षेच्या गलथानपणातून घडून आलेले प्रकार होते. श्रीलंकेत ज्यावेळेला तामिळी वाघ आणि सिंहली यांच्यातला संघर्ष सुरू होता त्यावेळी तामिळ ईलम या संघटनेने तामिळनाडूच्या किनारपट्टीचा शस्त्रास्त्र तस्करीसाठी भरपूर वापर करून घेतला होता. आणि त्याची अत्यंत घातक फळे तामिळनाडूलाही भोगावी लागली होती. इतका मोठा समुद्रकिनारा जर सुरक्षित ठेवण्याची तितकीच मोठी जबाबदारी नौदल आणि किनारपट्टीच्या राज्य सरकारांवर येऊन पडते. आणि त्याबाबत अक्षम्य हेळसांड होत गेली. आता जर याबाबतची दक्षता आणि सावधानता अधिक बाळगली जात असेल तर ते निश्चितच अत्यंत आवश्यक ठरते.

### महाराष्ट्राचा सागरी किनारा

ही विस्तीर्ण किनारपट्टी लक्षात घेऊनच भारताच्या सुरक्षिततेला धोका पोहचू शकतो. विशिष्ट अंतरापर्यंत त्या त्या देशाच्या समुद्री सीमा असतात आणि तिथे खोल समुद्रात नौदलाच्या वतीने गस्त घातली जाते. किनारपट्टीपासून साधारण पाच मैलापर्यंत त्या त्या राज्याच्या समुद्री पोलिसांना लक्ष ठेवावे लागते. म्हणूनच राज्य सरकारांनासुद्धा विशिष्ट वेगाच्या आणि विशिष्ट हत्यारे असलेल्या बोटी तैनात ठेवाव्या लागतात. दिघी बंदरावरून जेव्हा मुंबईत आरडीएक्स आणले गेले त्यावेळेला तिथे समुद्री पोलिसांची गस्तच नव्हती. हे सिद्ध झालेले आहे. पाच ते बारा मैलापर्यंत तटरक्षक दलाला कामगिरी पार पाडावी लागते. गेल्या काही वर्षात चीनने समुद्री महामार्ग तयार करून स्वतःच्या अधिपत्याखाली व्यापारवाढीची योजना आखली होती. त्यात भारतालाही सहभागी होण्याचे आवाहन केले होते. परंतु आपल्या हद्दीत कोणत्याही देशाला वाव द्यायचा नाही. हीच भारताची भूमिका असल्याने त्याला विरोध केला गेला आणि चीनने भारताच्या या भूमिकेबद्दल आदळआपटही केली होती. भारताचा एकूण विस्तीर्ण समुद्र किनारा लक्षात घेतल्यानंतर अशा प्रकारची सावधानता बाळगणे आवश्यकच होते. कदाचित भविष्यातील आव्हानांचा विचार करूनच आता या नव्या योजना कार्यान्वित होत असाव्यात. ज्यामध्ये सागरप्रहरी बलाच्या मोहीमेपासून ते सागरी सुरक्षेपर्यंतच्या योजनांचा समावेश होतो. महाराष्ट्राला तितकाच मोठा समुद्र किनारा लाभला असल्याने राज्याच्या आणि देशाच्या सुरक्षिततेसाठी ते अत्यंत महत्त्वाचे ठरते. या नव्या मोहीमांमध्ये महाराष्ट्रानेदेखील आपली भूमिका समर्थपणे पार पाडली पाहिजे.

# दोन संघटनांच्या कुस्तीत 'रुस्तम ए हिंद' चीतपट
# सिकंदर शेखला दिलेला किताब बेकायदेशीर

■ चंदिगड



**भारतीय कुस्ती संघटनामधील वाद जगजाहीर आहेत. पण या वादाचा कुस्तीपटूंना फटका बसत आहे. भारतीय शैली कुस्ती महासंघ आणि पंजाबमधील रुस्तम ए हिंद कुस्ती संघटना यांच्यातील वादात कुस्तीपटू सिकंदर दर शेख याने पटकावलेला रुस्तम ए हिंद किताब बेकायदेशीर ठरवण्यात आला आहे.इतकेच नव्हे तर शैली कुस्ती महासंघाने आता संबंधितावर कारवाई करण्यासाठी न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे.**

या दोन कुस्ती संघटनांच्या वादात सिकंदरला मिळालेला 'रुस्तम ए हिंद' हा किताबच चीतपट झाला आहे. ५ नोव्हेंबर २०२४ रोजी पंजाबमधील नवांशहर जिल्ह्यात रुस्तुम ए हिंद कुस्ती संघटनेने कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे 'रुस्तुम ए हिंद' हे नाव वापरले होते . या स्पर्धेत महाराष्ट्राचा पैलवान सिकंदर शेख यास रुस्तुम ए हिंद कुस्ती संघटनेने बेकायदेशीरपणे 'रुस्तुम ए हिंद' विजेता घोषित केले होते.पण त्याला आता शैली कुस्ती महासंघाने आक्षेप घेतला आहे .शैली कुस्ती महासंघाचे कार्यकारी अध्यक्ष जितेंदर राठी यांनी म्हटले आहे की , 'रुस्तम ए हिंद', 'हिंद केसरी' आणि 'भारत केसरी' किताबामुळे सरकारी नोकरी, शासकीय पेन्शन योजना आणि शासनाच्या योजनांचा लाभ घेता येतो, पण काही बनावट संघटना आणि पैलवान याचा गैरवापर करत आहेत. जे लोक आमच्या किताबाचे नाव स्वतःच्या नावापुढे वापरून समाजात खोटा नावलौकिक मिळवत आहेत. अशा लोकांवर आम्ही कायदेशीर कारवाई करणार आहोत. कारण 'रुस्तमए हिंद', 'हिंद केसरी' आणि भारत केसरी हे ट्रेडमार्क परवानगीशिवाय वापरणे हे कायद्याचे उल्लंघन आहे. त्यामुळे आम्ही कारवाई करणार आहोत. तर दिल्ली फेडरेशनच्या मार्गदर्शनाखाली सक्रीय असलेल्या रुस्तम ए हिंद या संघटनेने मला दिलेला किताब हा कायदेशीरच आहे असा दावा सिकंदर शेख याने केला आहे. त्यामुळे या वादावर आता न्यायालयातच तोडगा निघण्याची शक्यता आहे. कुस्तीपटू सिकंदर शेख यांच्याबाबतीत यापूर्वीही महाराष्ट्रात मोठा वाद निर्माण झाला होता आणि आता दोन कुस्ती संघटनांच्या वादात त्याचा किताब परत घेतला जाण्याची शक्यता आहे.

## आशियायी चॅम्पियनशिप महिला हॉकी स्पर्धा
## थायलंडचा धुव्वा उडवूनही पहिला क्रमांक हुकला

■ नालंदा



सध्या बिहारच्या राजबीर येथे सुरु असलेल्या आशियायी चॅम्पियनशिप महिला हॉकी स्पर्धेत भारताने सलग चौथ्या विजयाची नोंद करताना थायलंडचा १३ विरुद्ध ० गोलने धुव्वा उडवला. पण गुणतालिकेत पहिला क्रमांक पटकावण्यासाठी ३ गोल कमी पडले अन्यथा चीनला बॅकफूटवर ढकलून भारताने पहिला क्रमांक पटकावला असता. भारत आणि चीन दोन्ही संघ या मालिकेत अपराजित असून दोन्ही संघांचे प्रत्येकी ९ गुण झाले आहेत. पण चीनची सरासरी भारतापेक्षा अधिक असल्याने चीन पहिल्या क्रमांकावर आहे. थायलंड विरुद्धच्या सामन्यात भारताच्या दीपिकाने ५ गोल केले. तर मनीषा चौहान, प्रीती दुबे, लाल रेमासियामी ब्युटी डुंगडुंग या चौघींनी प्रत्येकी २ गोल केले. थायलंडला एकही गोल करता आला नाही.

## रणजीमध्ये अंशुल कंबोजचे १० बळी


■ चंदिगड



रणजी स्पर्धेचा पहिला टप्पा सुरु असून या स्पर्धेत खेळाडू आपल्या कामगिरीने लक्ष वेधून घेत आहेत. महिपाल लोमरोर, मोहम्मद शमी यांनी चांगलं कमबॅक केले आहे. दुसरीकडे, एकाच डावात १० विकेट घेत अंशुल कंबोज या युवा गोलंदाजांने आपलं कौशल्य दाखवले आहे. त्यामुळे आयपीएल लिलावात त्याचाही विचार केला जाईल. भारतीय संघ दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. दक्षिण अफ्रिकेत भारताने चांगली कामगिरी केली आहे. तर ऑस्ट्रेलियातील कामगिरीवर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतिम फेरीचे गणित अवलंबून आहे. असं असताना देशांतर्गत रणजी स्पर्धेत आणखी एक युवा तारा चमकला आहे. हरियाणा आणि केरळ यांच्यात सामना सुरु आहे. या सामन्यात हरियाणाच्या अंशुल कंबोजने केरळचे कंबरडे मोडले. एकाच डावात केरळचे १० गडी बाद करत एक विक्रम रचला आहे.

## प्रो कबड्डी लीग ! यु मुन्बाचा तमिळ थलायावर विजय

■ नोएडा



मनजीत आणि अजित चौहानच्या चढायांच्या जोरावर मध्यंतराला मिळविलेली २३-१२ ही नऊ गुणांची आघाडी निर्णायक ठरवत यु-मुम्बाने प्रो-कबड्डीच्या ११व्या पर्वातील ५४व्या सामन्यात गुरुवारी तमिळ थलायावर ३५-३२ असा तीन गुणांनी पराभव केला. तमिळ थलायावर बचावपटू नितेशकुमारने हाय फाईव्ह करीत सहा गुणांची कमाई केली. मात्र, नरेंद्र कंडोला आणि सचिन तंवर या चढाईपटूंना आलेले अपयश तमिळ थलायावर महागात पडले. या विजयाने यु मुम्बा संघ गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आला. पूर्वार्धातील अखेरच्या टप्प्यात वेग घेतल्यावर उत्तरार्धात पुन्हा एकदा संथ सुरुवात करण्याचे नियोजन यु मुम्बाला एकवेळ महागात पडणार असे वाटले होते. मात्र, मध्यंतराला मुम्बाकडे असलेली मोठी आघाडी निर्णायक ठरली. मुम्बाने उत्तरार्धात केवळ १२ गुणांची कमाई केली. दुसरीकडे तमिळ संघाने २० गुणांची कमाई करताना सामन्यातील रंगत वाढवली. उत्तरार्धात सामना संथ करताना मुम्बा संघाने अनेक बदल करत आपल्या बहुतेक खेळाडूंचा कस जाणून घेतला. मुम्बाकडून चढाईत मनजीतचे (१०) सुपर टेन आणि अजित चौहानचे (८) सातत्य निर्णायक ठरले.

## न्यूझीलंडचा गोलंदाज साऊदी कसोटीतून निवृत्त

■ वेलिंग्टन

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज टीम साऊदी २८ नोव्हेंबरपासूनइंग्लंडविरुद्धसुरूहोणाऱ्यामालिकेअखेर कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेणार आहे. १८ १५ डिसेंबर रोजी सौदी आपला शेवटचा कसोटी सामना हॅमिल्टन येथील सेडॉन पार्क येथे आपल्या घरच्या मैदानावर खेळणार आहे. साऊदी म्हणाला- आमचा संघ डब्ल्यू टी सी फायनलसाठी पात्र ठरला तर मी उपलब्ध असेन. साऊदी हा तिन्ही फॉरमॅटमध्ये न्यूझीलंडचा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे. त्याच्या नावावर ७७० आंतरराष्ट्रीय विकेट आहेत. निवृतीची घोषणा करताना तो म्हणाला. न्यूझीलंडचे प्रतिनिधित्व करणे हे माझे लहानपणापासूनचे स्वप्न होते.

## जिम्नॉस्टिक्स स्पर्धेत प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या खेळाडूंना मोठे यश

■ मुंबई



नुकत्याच औरंगाबाद येथे झालेल्या राज्य स्तरीय जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत मुंबई संघातील विलेपार्ल्याच्या प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलातील खेळाडूंनी सोळा पदके जिंकून चांगले यश मिळवले. त्यांचे एकुण १७ खेळाडु स्पधेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत प्रबोधनकार क्रीडा संकुलाच्या खेळाडूंनी १६ पदके जिकण्याचा विक्रम केला. प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या मुलींच्या गटात अनुष्का पाटील , ह्रतिकाप्रभूदेसाई, नीती दोषी तर मुलांच्या गटात मन कोठारी , निशांत करंदीकर , सार्थक राऊळ यांनी आगामी डिसेंबर महिन्यात गुजरात येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेकरिता आपली जागा निच्छित केली . प्रबोधनकार क्रीडा संकुलाचे प्रशिक्षक शुभम गिरी , विशाल कटाकडौंड , वंदिता रावल यांचे संकुलाचे अध्यक्ष अरविद र. प्रभू ,सचिव मोहन अ. राणे आणि समस्त विश्वत यांनी खास कौतुक केले .

## टी-२० सामन्यात वेस्ट इंडीज विरुद्ध इंग्लंडची विजयी हॅट्ट्रिक

■ लंडन



वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-२० मालिकेत इंग्लंडने सलग तिसरा विजय मिळवला आहे. गुरुवारी रात्री झालेल्या या सामन्यात संघाने ३ गडी राखून विजय मिळवला. या विजयासह संघाने ५ सामन्यांच्या मालिकेत ३-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. या मालिकेतील पुढील सामना १६ नोव्हेंबर रोजी सेंट लुसिया येथील ग्रोस आयलेट येथे खेळवला जाईल. इंग्लंडच्या संघाने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने २० षटकांत ८ गडी गमावून १४५ धावा केल्या.विंडीजची सुरुवात खराब झाली. संघाचे टॉप-५ फलंदाज दुहेरी आकडाही गाठू शकले नाहीत. शाई होप (४ धावा) डावाच्या पहिल्याच षटकात धावबाद झाला. त्याचवेळी साकिब महमूदने सलामीवीर इव्हान लुईसला (३ धावा) जोफ्रा आर्चरच्या स्पेलच्या दुसऱ्याच षटकात झेलबाद केले.पुढच्याच षटकात जोफ्रा आर्चरने निकोलस पूरनला बोल्ड केले. त्यानंतर पुढच्याच षटकात महमूदने रोस्टन चेसला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. दोघांनी ७-७ धावा केल्या. इंग्लिश फलंदाजांनी १४६ धावांचे लक्ष्य १९.२ षटकांत ७ गडी गमावून पूर्ण केले.इंग्लंडच्या साकिब मोहम्मदला सामनावीर म्हणून निवडण्यात आले. त्याने १७ धावांत ४ बळी घेतले. या मालिकेतील इंग्लंडचा हा मोठा विजय आहे.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**दुसऱ्याची गुणवत्ता ठरवत असताना आधी आपली पात्रता तपासून घेणे कधीही चांगले.**

## पंचांग

**शनिवार, १६ नोव्हेंबर, २०२४**
**शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर**



**कार्तिक कृष्ण प्रतिपदा**
**नक्षत्र : कृत्तिका**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०३-१६ मेष**
**०३-१७ ते २४-०० वृषभ**

**रवी उदय- ०६-४८**
**रवी अस्त- १७-५९**

**सूर्य वृश्चिक सकाळी ७.३१, पुण्यकाळ सकाळी ७.३१ ते १३.५५, महालय समाप्ती, राष्ट्रीय पत्रकारिता दिन**

## पाककृती

## सफरचंदाची रबडी



★ **साहित्य** - ५ किंवा ६ सफरचंद, छोटं पॅकेट मिल्क पावडर, दोन चमचा तूप, पाव लिटर दूध.

★ **कृती** - सफरचंद स्वछ धुवून पुसून घ्या, त्यानंतर सफरचंदाचे तुकडे करा आणि किसणीवर किसून घ्या. कढईत दोन चमचे तूप घाला. त्यात किसलेलं सफरचंद घाला आणि परतवून घ्या. मिश्रण तोपर्यंत हलवत रहा, जोपर्यंत ते मऊ होत नाही किंवा त्याला तूप सुटत नाही. त्यात पाव लिटर गरम दूध टाका. मिश्रण व्यवस्थित मिक्स करून घ्या. त्यानंतर त्यात मिल्क पावडर टाका. पाच ते दहा मिनिटे परतवून घ्या. रबडी तयार झाल्यावर फ्रिजमध्ये ठेवा. अशाप्रकारे तुमची सफरचंदाची रबडी तयार.

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**


Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

# फर्ग्युसन कंपनीचे संस्थापक हॅरी फर्ग्युसन

**फर्ग्युसन कंपनीचे संस्थापक हॅरी फर्ग्युसन यांचा जन्म ४ नोव्हेंबर १८८४ रोजी झाला. किले नावाच्या ब्रिटिश तंत्रज्ञांनी १८७५ मध्ये शेतीची अवजारे (मोठी यंत्रे) ओढण्यासाठी जनावरांऐवजी वाफेच्या एंजिनावर चालणाऱ्या ट्रॅक्टराचा उपयोग केली. त्या वेळी नांगर वगैरे अवजारे ट्रॅक्टराला तारदोरांनी जोडीत असत. ट्रॅक्टराचा जन्म जरी अशा तऱ्हेने इंग्लंडात झाला असला, तरी त्याचा खरा विकास अमेरिकेतच झाला. तेथे विपुल जमीन असल्यामुळे शेती उद्योगाच्या यांत्रिकीकरणाला खुपच वाव होता.**

अमेरिकेत शेतकामाची यंत्रे, उदा., झोडणी, मळणी, कोळपणी, लाकूड कापणी (शेती उद्योगातील उपांग) करणारी यंत्रे सुमारे १८५० पासून वापरात येऊ लागली. ती एकाच जागी मालकाच्या शेतात असत. वर उल्लेखिलेला वाफ एंजिनाचा ट्रॅक्टर आल्यावर तो मग घोडे लावून यंत्र असलेल्या ठिकाणी नेण्यात येत असे व ट्रॅक्टराची कप्पी यंत्राच्या कप्पीला पट्ट्याने फिरवी. या पद्धतीचा गव्हाच्या शेतीला अमेरिकेत त्या वेळी फार उपयोग झाला. काही दिवसांनी या ट्रॅक्टराला गाड्यावर बसवण्यात आले व तो ओढून नेण्यासाठी घोडे अनावश्यक झाले. बांधलेले रस्ते किंवा रूळ न लागणाऱ्या ट्रॅक्टरांनी जेव्हा जमीन नांगरण्यात येऊन लागली तेव्हा 'ट्रॅक्टर' शब्दाचा जन्म झाला. त्या वेळी ट्रॅक्टराची चाके पोलादाची असत आणि जमिनीत पकड मिळवण्यासाठी त्यांच्या प्रधींवर (कडांवर) कंगोरे ठेवलेले असत. हा ट्रॅक्टर इंधन व पाणी भरण्यासाठी अधून-मधून थांबवावा लागे. नांगराच्या तेरा फाळांपैकी सहा फाळ वापरून हा ट्रॅक्टर ७२ मिनिटांत २.६३ एकर (१ हेक्टरांपेक्षा किंचित जास्त) जमीन नांगरीत असे. या कामात गुंतलेली माणसे म्हणजे ट्रॅक्टराचा परिचालक, लाकडे आणि पाणी यांच्या पुरवठ्यासाठी एक माणूस व घोडे, एक आगवाला, दोन नांगर परिचालक आणि संशोधकातर्फे एक माणूस (ट्रॅक्टराच्या देखरेखीसाठी) अशी सहा माणसे व काही घोडे असत. ट्रॅक्टर हा अंतर्ज्वलन (सिलिंडरातच इंधनाचे ज्वलन होणाऱ्या) एंजिनाचाच असला पाहिजे अशी नंतरच्या काळात श्रद्धा बनली आहे. वाफ ट्रॅक्टर ही एक केवळ सुरुवातीची अल्पकालिक अवस्था होती. १८८९ मध्ये एका वाफ ट्रॅक्टराच्या गाड्यावर द. डकोटा राज्यात, जेव्हा एक





एकसिलिंडरी 'चार्टर' वायू एंजिन, चार्टर गॅस एंजिन कंपनीने बसवून नव्या तऱ्हेचा ट्रॅक्टर तयार केला तेव्हाच खऱ्या अर्थाने ट्रॅक्टर पर्वाला सुरुवात झाली असे मानतात. या कंपनीने असले आणखी सहा ट्रॅक्टर बनिवले. पहिला पेट्रोल एंजिन ट्रॅक्टर जे. आय. केस थ्रेशिंग मशीन कंपनीने १८९२ मध्ये बनविला. पुढील ७-८ वर्षांत जॉन फ्रोएलिक व जॉन डीअर यांनी अमेरिकेत, नीकोलाउस ओटो यांनी जर्मनीत व तसेच काही तंत्रज्ञांनी इंग्लंडात अंतर्ज्वलन एंजिनाचे ट्रॅक्टर बनविले. ओटो यांनी तर आपले १५ ट्रॅक्टर अमेरिकेत विकले. १९०१ मध्ये सी. डब्ल्यू. हार्ट व सी. एच. पार यांनी एक मोठ्या तेल-शीतन मंद गती, दोन फेरी आवर्तन एंजिनाचा ट्रॅक्टर बनविला. तसलेच आणखी १५ ट्रॅक्टर त्यांनी १९०३ पर्यंत विकले. ते इतके चांगले होते की, त्यातील निम्मे तरी १९२० पर्यंत चांगले काम देऊ शकले. १९०४ मध्ये बेंजामिन होल्ट यांनी पहिला पेट्रोल एंजिनी साखळीपट्ट्याचा ट्रॅक्टर बनिवला. पट्ट्याला लाकाडाचे ठोकळे बसविलेले होते. यात प्रत्येक पट्ट्याला स्वतंत्र क्लच बसविला होता व त्यामुळे तो वळविणे सोपे झाले. हे तत्त्व साखळीपट्ट्याच्या सर्व वाहनास अजूनही वापरले जाते. अशा तऱ्हेने ट्रॅक्टराचा विकास होत असता १९०६ मध्ये एकदम ११ ट्रॅक्टर उत्पादक कंपन्यांच्या स्थापनेने ट्रॅक्टर उद्योगाला सुरुवात झाली. हॅरी फर्ग्युसन यांचे २५ ऑक्टोबर १९६० रोजी निधन झाले.

# अर्चना घारे यांची राष्ट्रवादी शरद पवार गटातून हकालपट्टी

■ सावंतवाडी



**सावंतवाडी** विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतून बंडखोरी करून अपक्ष म्हणून निवडणूक लढवत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या कोकण विभागीय समन्वयक अर्चना घारे-परब यांना पक्षाने निलंबित केले आहे. तसे पत्र पक्षाचे राज्य सरचिटणीस रवींद्र पवार यांनी त्यांना दिले आहे.

राज्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार गट आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना यांची महाविकास आघाडी विधानसभा निवडणूक लढवत आहे. सावंतवाडी विधानसभा मतदारसंघ शिवसेना ठाकरे गटाला सुटला आहे. ठाकरे गटाचे उमेदवार राजन तेली हे याठिकाणी निवडणूक लढवत आहेत. असे असताना अर्चना घारे-परब अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत.हे पक्षाच्या शिस्तीस धरून नसल्याने त्यांना निलंबित करण्यात आले आहे.

# घाऊक महागाई वाढून ४ महिन्यांच्या उच्चांकावर

■ दिल्ली

**ऑक्टोबर** महिन्यातील किरकोळ किमतीवर आधारित महागाई ६.२ टक्के या ४ महिन्यांच्या उच्चांकावर गेली असतानाच घाऊक किमतीवर आधारित महागाईचा दर ऑक्टोबर महिन्यात वाढून २.३६ टक्के या चार महिन्यांच्या उच्चांकावर गेला आहे. अन्नपदार्थ, प्रामुख्याने भाज्या आणि उत्पादित वस्तूंचे दर वाढल्याने ही घाऊक महागाई झाली.

घाऊक महागाईचा दरही अन्न घटकाच्या किमती वाढल्यामुळे वाढला आहे. रिझर्व्ह बँक व्याजदर ठरविताना

## भाज्या महागल्या

घाऊक किमतीवर आधारित महागाई विचारात घेत नाही. तर किरकोळ किमतीवर आधारित महागाई विचारात घेते. किरकोळ किमतीवर आधारित महागाई काही महिने चार टक्क्यांच्या आत राहिल्यानंतर रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर कपात अपेक्षित असते. मात्र या महागाईचा दर ६.२ टक्के वर गेला आहे. त्यामुळे डिसेंबरमध्येच नाही तर फेब्रुवारीमध्येही व्याजदर कपात होणार नाही, असे समजले जात आहे.

या आठवड्याच्या सुरुवातीला जारी करण्यात आलेल्या ग्राहक किंमत निर्देशांकाच्या आकडेवारीनुसार, खाद्यपदार्थांच्या किमतीत तीव्र वाढ झाल्याने किरकोळ महागाई १४ महिन्यांच्या उच्चांकी ६.२१ टक्क्यांवर पोहोचली आहे.

# विद्यार्थिनीच्या विनयभंग प्रकरणी गायक संजय चक्रवर्तींना कोठडी

■ मुंबई

**आपल्या** संस्थेतील १५ वर्षीय विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याप्रकरणी प्रसिद्ध गायक आणि संगीतकार संजय चक्रवर्ती यांना कोलकाता पोलिसांनी मुंबईतून अटक केली. त्यांना १८ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

संजय चक्रवर्ती हे प्रख्यात शास्त्रीय गायक अजय चक्रवर्ती यांचे बंधू आहेत. जूनमध्ये कोलकात्यातील योग संस्थेतून सर्व विद्यार्थी निघून गेल्यानंतर संजय चक्रवर्तींनी विद्यार्थिनीचा विनयभंग केला होता. त्यानंतर विद्यार्थिनीच्या तक्रारीवरून कोलकात्यातील चारू मार्केट पोलिसांनी पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस २ महिन्यांपासून पोलीस त्यांच्या मागावर होते. कोलकात्यातील चारू मार्केट पोलिसांनी मुंबईत त्यांना अटक केली. त्यानंतर न्यायालयात हजर केले असता त्यांना १८ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

# ५३ कोटी द्या, ईव्हीएम हॅक करतो मविआच्या खासदाराला ऑफर

■ मुंबई

**महाविकास** आघाडीच्या एका खासदाराला अमेरिकन हॅकरने ईव्हीएम यंत्र हॅक करून देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. यासाठी ५३ कोटींची मागणी केली आहे.

संबंधित खासदाराने याप्रकरणी पोलिसांना कळवले आहे. पोलिसांनी याबाबत तपास केला आहे. सय्यद शुजा असे ईव्हीएम हॅक करण्याचा प्रस्ताव ठेवणाऱ्या हॅकरचे नाव आहे. तो स्वतःला व्हिसलब्लोअर म्हणवतो. त्याच्या दाव्यानुसार, तो अमेरिकन संरक्षण विभागात कंत्राटी पद्धतीवर कार्यरत आहे. त्याने तेथील तंत्रज्ञानाच्या मदतीने ईव्हीएम मशीन हॅक करण्याचा दावा केला आहे. यासाठी तो महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या नेत्यांशी संपर्क साधून त्यांच्यापुढे ईव्हीएम हॅक करून देण्याचा प्रस्ताव ठेवत आहे. त्याने नुकताच एका खासदाराशी संपर्क साधून ५३ कोटींच्या मोबदल्यात ६३ जागांवरील ईव्हीएम हॅक करून देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

# मोदींमुळेच देश सुरक्षित! अमित शहांचे वक्तव्य

■ हिंगोली

**विधानसभा** निवडणुकीच्या प्रचारासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज हिंगोली येथील रामलिला मैदानावर प्रचारसभा घेतली. देशात बॉम्बस्फोट होत असताना सोनिया गांधी आणि मनमोहन सिंग यांचे सरकार शांत बसले होते. आता नरेंद्र मोदींच्या सरकारने पाकिस्तानात सर्जिकल स्ट्राईक करून अतिरेक्यांचा खात्मा केला. नरेंद्र मोदी यांनीच देशाला सुरक्षित ठेवण्याचे काम केले, असा दावा अमित शहांनी या सभेत केला.

अमित शहा म्हणाले की, महाराष्ट्रात औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव, अहमदनगरचे अहिल्यानगर, वर्सोवा, वरळी सी लिंकचे सावरकर असे नामकरण आम्ही केले. मात्र काँग्रेसने नवीन उपक्रमांना पंडीत नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्याशिवाय कोणाचेही नाव दिलेले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करण्याचे काम काँग्रेसने केले. काँग्रेस सरकार पायउतार झाल्यानंतरच बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न मिळाला. काँग्रेसच्या सोनिया गांधी यांनी राहुल गांधी यांना लॉन्च करण्याचे २० वेळा प्रयत्न केले. आता २१ वा प्रयत्न देखील फोल ठरला आहे. अफजलखान, औरंगजेबाची कबर सुशोभित करणाऱ्यांना आणि कसाबला बिर्याणी देणाऱ्यांना साथ देणाऱ्या उध्दव ठाकरेंनी बाळासाहेब ठाकरे यांनी कोणता मार्ग दाखविला हे लक्षात घेतले पाहिजे.

# नाशिकमध्ये भाजपा आणि ठाकरे गटामध्ये हाणामारी

■ नाशिक

**मतदारांच्या** स्लीप वाटपावरून भाजपा आणि ठाकरे गटातील कार्यकर्त्यांमध्ये मोठी हाणामारी झाल्यामुळे नाशिकमधील अंबड पोलीस स्थानकाबाहेर गोंधळ उडाला. नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघात ठाकरे गटाचे उमेदवार सुधाकर बडगुजर यांचे समर्थक मतदार स्लीप वाटत होते. त्यावेळी क्षुल्लक कारणावरून ठाकरे गट आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. वाद इतका विकोपाला गेला की, दोन्ही बाजूने हाणामारी सुरू झाली. या हाणामारीत ठाकरे गटाचे उमेदवार सुधाकर बडगुजर यांचा कार्यकर्ता जखमी झाला.

# ऐरोली विधानसभा मतदारसंघात मराठा फॅक्टर ठरणार यशस्वी?

## ४० टक्के मराठा मतदार

■ नवी मुंबई

**राज्यामध्ये** मराठा आरक्षणाचा मुद्दा जोर धरत असतानाच विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ऐरोली विधानसभा मतदारसंघात मराठा फॅक्टर यशस्वी ठरण्याची शक्यता राजकीय तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. नवी मुंबई परिक्षेत्रात पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाज मोठ्या संख्येने राहतो. या ठिकाणी ४० टक्के मराठा समाजाचे मतदार दर निवडणुकीला मतदाना दिवशी आपला मतदानाचा हक्क बजावतात. दरम्यान, यंदाची विधानसभा निवडणूक राज्यामध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा तापलेला असतानाच होत असल्याने मराठा समाजाचा कौल ऐरोलीमध्ये निर्णायक ठरणार आहे.

यंदा ऐरोली विधानसभा मतदारसंघातून मतदारांच्या संख्येमध्ये कमालीची वाढ झाली असून, मराठा समाजाच्या मतदारांचा कौल हा या निवडणुकीमध्ये अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे. मराठा समाज ऐरोलीमध्ये किंग मेकरच्या भूमिकेत असून, समाज ज्या बाजूने कौल देईल तो ऐरोलीमधील आमदार होईल, अशी स्थिती निर्माण झाली आहे.



ऐरोलीमध्ये गणेश नाईक हे विद्यमान आमदार असून, ते पुन्हा विधानसभा निवडणुकीला सामोरे जात आहेत. गणेश नाईक हे आगरी समाजातून येत असल्यामुळे गणेश नाईकांच्या पाठीमागे आगरी समाजाचे मताधिक्क्य आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीकडून मनोहर मढवी हे देखील उभे असल्याने आगरी समाजाच्या मतांचे इथे विभाजन होण्याची शक्यता आहे.

याचसोबत विजय चौगुले यांनी देखील अपक्ष उमेदवारी अर्ज कायम ठेवून ते निवडणुकीच्या मैदानामध्ये उतरले आहेत. विजय चौगुले हे वडार समाजातून येत असल्याने वडार समाज बांधव हे त्यांच्या पाठीशी आहे. दुसरीकडे महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे अंकुश कदम हे मराठा समाजाचे प्रतिनिधित्व करणारे नेते असून मराठा समाजाचा त्यांच्याकडे बहुतांशी ओढा आहे. अंकुश कदम यांनी सुरुवातीपासूनच मराठा क्रांती मोर्चामध्ये सहभागी होऊन आपल्या समाजसेवेची सुरुवात केल्याने मराठा चेहरा म्हणून ते लोकांच्या पसंतीस उतरत आहेत.

ऐरोली विधानसभेत निवडणुकीचे असे चित्र असताना मराठा समाज किंगमेकरच्या भूमिकेत आहे. स्थानिक मुद्यांना घेऊन मराठा समाजाची भाजपावर नाराजी आहे. या सर्वांचा फायदा किंवा तोटा या निवडणुकीत कुणाला होणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## पश्चिम महाराष्ट्रातील मतदारांचा अंकुश कदमांना फायदा

ऐरोली विधानसभा मतदारसंघांमध्ये पश्चिम महाराष्ट्रातून येणारा माथाडी वर्ग व कष्टकरी कामगार हा मोठ्या प्रमाणावर आहे. या वर्गाचे मत प्राबल्य देखील इथे मोठ्या प्रमाणावर असून, याचा फायदा अंकुश कदम यांना होऊ शकतो असे बोलले जात आहे. त्यामुळे अंकुश कदमांना ऐरोली विधानसभा मतदारसंघात फायदा होऊ शकतो.

# शिराळ्यातील मोरणा नदी कोरडी पडू लागली



■ सांगली

**जिल्ह्यातील** शिराळा शहरानजीक असलेले मोरणा धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. मात्र रब्बी हंगामातील पिके व उसासाठी शेतकऱ्यांनी पाणीउपसा सुरू केल्याने चार-पाच दिवसांपासून मोरणा नदीपात्र मात्र कोरडे पडू लागले आहे.

यंदा शिराळा तालुक्यात सरासरीहून अधिक पाऊस पडला आहे. तसेच परतीच्या तसेच मान्सूननंतरच्या पावसाने पुन्हा हजेरी लावल्याने तालुक्यात १०० टक्के पाणीसाठा झाला आहे. शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. शिराळा शहरानजीक असलेले ७४७.९४ दलघफू क्षमतेचे मोरणा धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. धरणात ५८४.०७ दलघफू उपयुक्त पाणीसाठा आहे. मोरणा धरणातील पिण्याच्या व शेतीच्या पाण्यासाठी २० गावे पाणीपुरवठा योजना अवलंबून आहेत. नोव्हेंबरमध्ये नदी प्रवाहित राहण्याची ही पहिलीच वेळ आहे. १० नोव्हेंबरपर्यंत नदी प्रवाहित होती.

# ठाणेकरांना दूषित पाणीपुरवठा? पाण्यावर शुद्धीकरण प्रक्रिया पालिकेचे माजी नगरसेवक हिरालाल भोईर यांचा दावा

■ ठाणे

**ठाणे** शहराला पिसे धरणातून आलेल्या पाण्यावर फिल्ट्रेशन प्रक्रिया करून पाणीपुरवठा केला जातो. मात्र हे पाणी अतिशय दूषित असून पम्पिंग स्टेशनला पुरवल्या जाणाऱ्या घाण पाण्यावर शुद्धीकरण प्रक्रिया राबवून हे पाणी मिळत असल्याचा दावा पालिकेचे माजी नगरसेवक हिरालाल भोईर यांनी केला आहे.

माजी नगरसेवक हिरालाल भोईर यांनी म्हटले आहे की, पिसे धरणातून येणाऱ्या पाण्यामध्ये आजूबाजूला असणारे वासिंद शहरातील जिंदाल कंपनीतील दूषित पाणी तसेच संपूर्ण शहराचे ड्रेनेजचे पाणी तसेच खडवली, भादाणे, आतकोली, आरंजोनोली या सर्व गावांतील जनावरांचे मलमूत्र, शेण तसेच अर्धवट जळालेले मृतदेह या सर्वांचे मिश्रण असलेले दूषित पाणी पम्पिंग स्टेशनला पुरविले जात असल्याचे समोर आले आहे. त्याच पाण्यावर फिल्ट्रेशन प्रक्रिया करून हे पाणी पिण्यासाठी ठाणे शहराला पुरविले जाते. ही माहिती ग्रामस्थांशी चर्चा करून तसेच प्रत्यक्षात जागेवर पाहणी केल्यानंतर समोर आली आहे. दरम्यान, भातसा धरणातून थेट पम्पिंग स्टेशनपर्यंत म्हणजे सुमारे ४० ते ४५ किलोमीटर पाईपलाईन टाकून बंदीस्त स्वरूपात शुद्ध पाणी पम्पिंग स्टेशनपर्यंत पुरवठा करणे पालिकेच्या अधिकाऱ्यांना शक्य असतानाही हे अधिकारी या प्रकाराकडे दुर्लक्ष करीत आहे.



# अपक्ष उमेदवार अमृत तांबडे यांच्यावर आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल

■ रत्नागिरी

**निवडणूक** आयोगाने परवानगी नाकारलेली असतानाही जाहीरनामा पत्रके वाटल्याप्रकरणी राजापुरातील अपक्ष उमेदवार अमृत तांबडे यांच्यावर आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आचारसंहिता भंगाचा रत्नागिरी जिल्ह्यातील हा दुसरा गुन्हा असून, यापूर्वी चिपळूणात सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.


तांबडे यांनी आपला जाहीरनामा तयार केला असून, तो प्रसिद्धी करण्याची परवानगी निवडणूक अधिकाऱ्यांकडे मागितली होती. मात्र, या जाहीरनाम्यातील काही मुद्दे गैर ठरवून निवडणूक अधिकाऱ्यांनी तो प्रसिद्ध करण्यास आणि मतदारांमध्ये वाटण्यास परवानगी नाकारली होती. त्यानंतरही त्यांनी या जाहीरनाम्याचे पत्रक मतदारसंघात वाटले आणि त्याची जाहिरातही केली. याप्रकरणी निवडणूक नोडल अधिकारी जितेंद्र जाधव यांनी त्यांच्याविरोधात राजापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

# हिमाचल प्रदेशात थंडी! राज्यातील तापमान घटले

■ मुंबई

**हिमाचल** प्रदेशात गेल्या काही दिवसांमध्ये कडाक्याची थंडी पडली असून अनेक भागात मोसमातील पहिली बर्फवृष्टी झाली आहे. उत्तरेकडून येणाऱ्या गार वाऱ्यांमुळे राज्यातील तापमानातही घट झाली आहे. राज्याच्या अनेक भागात रात्रीच्या तापमानात घट झाली आहे.

राज्यातील अनेक भागात थंडी वाढत असून नाशिक जिल्ह्यात यंदाच्या नीचांकी तापमानाची नोंद झाली आहे. निफाड तालुक्यातही कडाक्याची थंडी पडली असून, मुंबई



पुण्यासह अनेक भागांतील तापमानात घट झाली आहे. राज्यातील नाशिक, सोलापूर, सांगली, सातारा या पट्ट्यात उद्यापर्यंत अचानक पावसाची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यातील सर्वच भागांत मतदानाच्या दिवशी कडाक्याची थंडी असेल, असा इशारा पंजाबराव डख यांनी काही दिवसांपूर्वी दिला होता. विदर्भ, मराठवाड्यात मात्र हवामान कोरडे असून, रात्रीच्या तापमानात मोठी घट झाली आहे. मुंबई परिसरात व कोकणातही हवामान सुखद झाले आहे. उत्तरेतील वाऱ्यांमुळे तापमानात झालेली घट पुढेही सुरुच राहणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

# गोव्यातील समुद्रामध्ये बांगडा माशांची चलती



■ पणजी

**गेल्यावर्षी** प्रमाणे यंदाही गोव्यातील समुद्रात अन्य मोठ्या माशांपेक्षा बांगडा माशाचीच चलती दिसून येत आहे. बांगड्यांच्या उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. गेल्या तीन वर्षांपासून बांगड्यांची मागणी वाढली आहे.

राज्यात इसवण आणि शिंगाला म्हणजेच कॅटफिश सारख्या मोठ्या माशांपेक्षा बांगड्यांचे उत्पादन जास्त होते. एलईडी मासेमारीचा याला फटका बसला आहे. मोठे मासे एलईडी वापरणाऱ्या ट्रॉलरवाल्यांना मिळतात असे मच्छीमारांचे म्हणणे आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यात मासे मिळण्याचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये पुन्हा बांगड्यांची संख्या वाढली आहे. २०२१-२२ मध्ये राज्यातील एकूण मत्स्य उत्पादन १ लाख ११ हजार टन होते. त्यानंतर २०२२-२३ मध्ये १ लाख १६ हजार टन मत्स्य उत्पादन झाले.

# नवी मुंबई महापालिकेच्या शिष्यवृत्ती अर्जासाठी मुदतवाढ

■ नवी मुंबई

**आर्थिकदृष्ट्या** दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना नवी मुंबई महापालिकेच्या वतीने लागू करण्यात आली आहे. या योजनेचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवली आहे, अशी माहिती समाज विकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे यांनी दिली.

त्यासाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने www.schemenmmc.com या संकेतस्थळावर स्वीकारण्यात येत आहेत. अद्यापपर्यंत ३१ हजारहून अधिक अर्ज प्राप्त झाले असल्याचे त्यांनी सांगितले. महापालिका कार्यक्षेत्रातील इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती वितरण करणे ही योजना पालिकेमार्फत ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता शिष्यवृत्ती योजनेमध्ये विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलांना, आर्थिक व दुर्बल घटकातील इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना, इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन शिक्षणासाठी गुणवत्ताप्राप्त मागासवर्गीय विद्यार्थांना, महापालिका क्षेत्रातील स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मुलांना, पालिका आस्थापनेवरील सफाई कामगार व कंत्राटी कामगारांच्या मुलांना, नवी मुंबईतील दगडखाण/बांधकाम/रेती/नाका कामगारांच्या मुलांना अशा विविध घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती वितरण करण्यात येणार आहे.

नवाकाळ

# चंदेरी च्वींगम

पुणे । शनिवार १६ नोव्हेंबर, २०२४

web:http://navakal.in | e-mail: navakal.1923@gmail.com



## 'निर्धार'च्या शूटिंगला कोल्हापूरमध्ये सुरुवात

मनोरंजनासोबतच समाज प्रबोधन करणाऱ्या 'निर्धार' या सिनेमाचे चित्रीकरण नुकतेच कोल्हापूरमध्ये सुरू झाले. यावेळी ज्येष्ठ कलादिग्दर्शक सतीश बिडकर उपस्थित होते. निर्मात्या पद्मजा वालावलकर यांच्या जयलक्ष्मी क्रिएशन या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती सुरू आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक दिलीप भोपळे असून लेखन दिनानाथ वालावलकर यांनी केलं आहे. कोल्हापूर आणि आसपासच्या विविध ठिकाणी 'निर्धार'चं चित्रीकरण वेगात सुरू झाले आहे. या चित्रपटात डॉ. गिरीश ओक, सौरभ गोगटे, पल्लवी पटवर्धन, प्रज्ञा केळकर, मिलिंद ऊके, उमेश बोळके, अभिनव कुरणे, जान्हवी सावंत, ऋतुजा कनोजिया, अथर्व पाटील, श्रेयस मोहिते, दिनानाथ वालावलकर, युवराज झुगर, केतकी पाटील, पल्लवी प्रसाद, आनंद पाटील, सुरेंद्र केतकर वगैरेंच्या प्रमुख भूमिका आहेत. कला दिग्दर्शन विकी बिडकर यांचे आहे.

## अरबाज - निक्कीची मनाली टूर



'बिग बॉस मराठी ५' संपल्यानंतरही अरबाज आणि निक्की या दोघांनी आपले नाते जपले आहे. सध्या दोघे हिमाचल प्रदेशमध्ये एकमेकांसोबत वेळ घालवत आहेत. निक्की आणि अरबाज दोघांनीही सोशल मीडियावर व्हेकेशनचे फोटो शेअर केले आहेत. दोघांचे नाते अजूनच खुलताना पहायला मिळत आहे. बिग बॉसच्या घरातून अरबाज बाहेर पडल्यानंतर दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला होता. निक्कीच्या आईने बिग बॉसच्या घरात येऊन तुला अरबाजच्या साखरपूड्याविषयी सांगितले होते. बिग बॉस संपल्यानंतर निक्की आणि अरबाज पुन्हा एकत्र आले होते.

## जागृतीप्रमाणेच प्राणीमात्रांवर प्रेम



झी टीव्हीवरील नवीन मालिका 'जागृती' या मालिकेत छोटी अभिनेत्री **अस्मी देव** ही नायिका जागृतीच्या रुपात झळकतेय. खरं तर तिची भूमिका खरी बनते प्राणीमात्रांवर तिचे खरोखर प्रेम असल्यामुळे. याच पार्श्वभूमीवर तिच्याशी केलेली बातचीत...

**अस्मी, तू छोटी जागृती साकारत आहेस. या मालिकेबद्दल काय सांगशील?**

- होय. झी टीव्हीवरील 'जागृती - एक नयी सुबह' या मालिकेत मी नायिका जागृती हिच्या बालपणीची भूमिका करतेय. ती आपल्या 'चित्ता' समुदायाच्या स्वातंत्र्य, शिक्षण आणि न्यायासाठी लढतेय. माझे मुक्या प्राण्यांवर खूप प्रेम आहे. ते बोलू शकत नाहीत, आवाज उठवू शकत नाहीत. म्हणून जागृतीप्रमाणेच मी त्यांच्यासाठी लढते, त्यांची काळजी घेते. त्यांच्यासोबत बराच वेळ घालवते.

**तुला प्राणी खूप आवडतात का?**

- हो. मला सगळेच प्राणी आवडतात. मला पहिल्यांदा जेव्हा या भूमिकेसाठी विचारण्यात आले, तेव्हा सेटवर प्राण्यांसोबत राहावे लागेल या विचारानेच मी उत्साहात होते. शॉट्सच्या दरम्यान कुत्रे, मांजरी आणि सशांसोबत खेळायला आणि त्यांची काळजी घ्यायला मला मजा वाटते. त्यांच्यासाठी मी काहीतरी करतेय याचे समाधान वाटते. माझी व्यक्तिरेखा स्वातंत्र्यासाठी लढणारी आहे. जे स्वतः आवाज उठवू शकत नाहीत त्यांचे रक्षण करणारी आहे. मलाही खऱ्या आयुष्यात तसेच करायचे आहे.

**जागृतीसुद्धा अशीच आहे का?**


- साधारण तशीच आहे. तिच्या मनातली सहानुभूती आणि लोकांसाठी काही करण्याची वृत्ती मालिकेत दाखवण्यात आली आहे. यामुळेच जागृती खरी वाटते. म्हणूनच ही भूमिका प्रेक्षकांना आपलीशी वाटते. माझ्या भूमिकेद्वारे लोकांवर, प्राण्यांवर माया करावी हा संदेश आम्ही देत आहोत.

**'जागृती'मध्ये मालिकेत आता पुढे काय पाहायला मिळणार आहे?**

- आता प्रेक्षकांना पाहायला मिळेल की, खलनायक कलिकांत (आर्य बब्बर) याने मार्गात उभ्या केलेल्या आव्हानांचा सामना जागृती करू शकेल का? आणि आपला हक्क असलेले शिक्षण ती मिळवू शकेल का? या व्यक्तिरेखेमधून मला ऑनस्क्रीन आणि ऑफस्क्रीन दयाळूपणा आणि धैर्य दाखवता येत आहे.

**सहकलाकार आर्य बब्बर यांच्याविषयी काय सांगशील?**

- आर्य बब्बर या मालिकेत खलनायक कलिकांत साकारत आहेत. दडपशाही करायला त्यांना आवडते. पण मुळात आर्य बब्बर तसे नाहीत. त्यांच्यासोबत काम करताना मला खूप मजा येते. ते मला खोडकर म्हणतात. सीन नसतो तेव्हा आम्ही खूप धमाल करतो. मी त्यांना त्यांच्या खऱ्या नावाऐवजी 'कलिकांत अंकल' म्हणून हाक मारते, तर ते मला अस्मीऐवजी 'जग्गू' म्हणतात. मला गोड खायला आवडते म्हणून बरेचदा ते माज्यासाठी चॉकलेट आणतात. मी अभ्यास सांभाळून अभिनय करते याचं त्यांना मोठं कौतुक वाटतं.



## शर्वरीची स्वप्नपूर्ती

बॉलिवूडची रायझिंग स्टार शर्वरीने खुलासा केला आहे की ॲक्शन हा तिचा आवडता जॉनर आहे. सध्या ती वायआरएफ स्पाय युनिव्हर्सच्या आगामी 'अल्फा' या चित्रपटात आलिया भट्टसोबत काम करत आहे. या चित्रपटात आलिया आणि शर्वरी सुपर-एजंट्सच्या भूमिका साकारत आहेत, ज्यामध्ये त्या दोघी स्पायवर्सच्या मिशनवर एकत्र येतात. या चित्रपटातील ॲक्शनसाठी सध्या ती खूप मेहनत घेतेय. शर्वरी म्हणाली 'माझं ॲक्शनवर खूप प्रेम आहे, आणि मी आणि माज्या बहिणीला एकत्रितपणे ॲक्शन चित्रपट पाहायला आवडतं. त्यामुळे अल्फाचा ऑफर मिळाल्यावर मी एक क्षणही न गमवता होकार दिला! माझ्या मनात नेहमी एक ॲक्शन करण्याचं स्वप्न होतं, आणि आता ते प्रत्यक्षात येत आहे.'

## 'लापता लेडीज'चे नाव बदलल्याने चाहते नाराज

किरण राव आणि आमीर खान यांची निर्मिती असलेला 'लापता लेडीज' हा सिनेमा ऑस्करसाठी पाठवण्यात आल्याचे सर्वांना माहीत आहे. पण ऑस्करसाठी स्क्रिनिंग झाले तेव्हा त्याचे नाव 'लापता लेडीज'ऐवजी 'लॉस्ट लेडीज' असे करण्यात आले. भारत आणि




हिंदीवर अतोनात प्रेम असणाऱ्या चाहत्यांना हा आपल्या भाषेचा अपमान वाटला आहे. यामुळे हे नेटिजन्स प्रचंड नाराज झाले असून सोशल मीडियावर या नाखुशीच्या कमेंट्सचा पाऊस पडतोय. याबद्दल एक चाहता लिहितो, 'लॉस्ट म्हणजे हरवलेला, पुन्हा मिळणारच नाही असा... मात्र हिंदीतल्या लापता शब्दाचा अर्थ शोध सुरू असलेला माणूस, असा होतो. यामुळे लापता शब्दाऐवजी लॉस्ट शब्द वापरणे चुकीचे आहे.' दुसरा नेटिजन म्हणतो, 'आंतरराष्ट्रीय मंचावर जाताना हिंदी भाषेचा सन्मान आपणच टिकवणे गरजेचे असते. इंग्लीशप्रमाणे वागणे हे गुलामगिरी अजूनही सुटली नसल्याचे लक्षण आहे.' या सिनेमाचे स्क्रिनिंग न्यूयॉर्कमधील शेफ विकास खन्ना यांनी आयोजित केले होते.

## शुटिंगसाठी मारली नदीत उडी

'लाखात एक आमचा दादा' मालिकेत तुळजा सूर्याला नदीच्या पात्रात प्रोपोज करणार आहे. तुळजा प्रेमाची खरी कबुली देण्यासाठी नदीत उडी मारणार आहे. या सीनसाठी तुळजा म्हणजेच दिशा परदेशीही



उत्सुक आहे कारण तिने पहिल्यांदाच असा सीन शूट केलाय. याबाबत दिशा म्हणते, 'तुळजाचा प्रपोजल सीन खूप युनिक आहे. मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदा असं काही अनुभवतेय. मला नदीत उडी मारायची होती, पाणी खूप थंड होत आणि हा सीन सर्वांसाठी महत्वाचा होता. वेळ घेऊन आणि प्रत्येक गोष्टीची काळजी घेऊनच सीन शूट होत होता. मी हा अद्वितीय अनुभव कधीच विसरू नाही शकणार. मी साडी नेसली होती, मला साडी आणि मेकअप दोन्ही सांभाळायचा होता आणि एक्सप्रेशन देऊन डायलॉग्स ही बोलायचे होते. सगळं एकत्र मॅनेज करून निभावणं मला प्रचंड वेगळा अनुभव देऊन गेला. शूट करत असताना नितीश आणि माज्या पायाला दगड टोचत होते पण आम्ही हा सीन पूर्ण केला. जवळपास ५ ते ६ तास तो सीन सुरु होता आणि तितका वेळ आम्ही पाण्यात होतो.'



## शाहरुख खान पुन्हा खलनायक बनणार

बॉलिवुडमध्ये संघर्ष करताना शाहरुख खानने 'डर' आणि 'बाजीगर' या चित्रपटांत खलनायकी केली होती. पण याच सिनेमांना यश मिळाल्यावर तो कायम नायकच बनला. मात्र आत्ताच मिळालेल्या वृत्तानुसार तो पुन्हा एकदा खलनायकीकडे वळणार की काय अशी शक्यता निर्माण झाली आहे. कारण निर्माते रतन जैन यांनी १९९३ साली बनवलेल्या आपल्या 'बाजीगर' या सिनेमाचा सिक्वल बनवायचे ठरवले आहे. त्या चित्रपटात शाहरुख खान, काजोल आणि शिल्पा शेट्टी यांच्या प्रमुख भूमिका होत्या. याचा सिक्वल बनवण्यावर रतन जैन ठाम आहेत. नुकतेच ते म्हणाले, शाहरुखशी 'बाजीगर-२' या सिनेमाबद्दल चर्चा सुरू आहे. त्याने अजून याबाबत काहीच उत्तर दिलेले नाही. पण नकारही दिलेला नाहीये. पुढच्या भागाची दमदार पटकथा आली की तो यावर विचार करणार आहे, असेही जैन यांनी स्पष्ट केले.

## 'हजारवेळा शोले पाहिलेला माणूस' इफ्फीचा मानकरी





पणजी येथील ५५व्या 'इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडिया' (इफ्फी) या सोहळ्यात झळकण्याचा मान 'हजारवेळा शोले पाहिलेला माणूस' या मराठी चित्रपटाला मिळाला आहे. महोत्सवात या चित्रपटाला गाला प्रीमियर आणि रेड कार्पेटचा सन्मान जाहीर झाला असून २४ नोव्हेंबरला हा सोहळा रंगणार आहे. चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन हृषिकेश गुप्ते यांनी केलं आहे. अमोल गोळे यांनी छायांकन, रोहन रोहन यांनी संगीत दिले आहे. चित्रपटाच्या नावामुळेच त्याच्या कथानकाविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटात दिलीप प्रभावळवकर, सोनाली कुलकर्णी, सिद्धार्थ जाधव, प्राजक्ता दातार, मिलिंद शिंदे, किशोर कदम, समीर धर्माधिकारी, आनंद इंगळे, श्रीरंग महाजन यांच्या प्रमुख भूमिका आहेत. भारतीय चित्रपटजगतात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या इफ्फीमध्ये चित्रपटाला गाला प्रीमियरचा मान मिळणं ही कौतुकाची गोष्ट आहे.



## १९९७ पासून शहाणी मुलगी... प्रियदर्शिनीच्या पोस्टने वेधले लक्ष

बालदिनानिमित्त अभिनेत्री प्रियदर्शिनी इंदलकर हिने तिचा शाळेतील फोटो पोस्ट केला आहे. फोटोसोबत दिलेल्या कॅप्शनमध्ये तिने लिहिलेय '१९९७ पासून शहाणी मुलगी. बालदिनाच्या शुभेच्छा.' या फोटोत प्रियदर्शिनीने पांढरा शर्ट, निळे फ्रॉक, पांढरे मोजे आणि काळे बुट तसेच कमरेला पट्टा असा संपूर्ण शाळेचा गणवेश परिधान करून तिने यावर स्वतःचे आयडीकार्ड सुद्धा लावले आहे. प्रियदर्शिनीचा लहानपणीचा फोटो पाहून चाहते सुद्धा चकित झालेत. प्रत्येकजण कमेंटमध्ये या फोटोचे कौतुक करीत आहेत.

# नवाकाळ शब्दकोडे-१०७७



**आडवे शब्द –**

१. एकाकी पडलेला ४. चटकन पेट घेणारे ७. प्रचंड ९. भिडेला बळी पडणारा ११. राजाचा सचिव, प्रधान १२. चरबी १४. धुंदी १६. डोळे, नयन १७. स्वच्छ धुणे ५०. पत्रास ठेवणे, आदराने वागवणे २२. सरण २३. टायफॉईड, मुदतीचा ताप २५. ताजा, प्रसन्न २८. नंतर २९. जास्वंद ३०. फुलाची पाकळी ३२. आवश्यकता ३४. विजेत्याला मिळणारा चषक ३६. काया ३८. स्टेजवर विनोदी नक्कल/मिमिक्री करणारा ४१. वाचाळ, बोलघेवडा ४३. बॉक्स वगैरेसाठीचा जाड कागद ४४. बाळाचे केस ४५. ठीक, मध्यम ४७. फणसाचा एक प्रकार ४९. मुलाची बायको ५०. मस्तक ५१. तल्लीन ५२. जीन, पलाण ५४. युद्ध ५५. स्वारस्य, रुची ५६. कमी, उणे ५७. त्रास, भुणभुण ५९. झुंड ६०. वनस्पतीचे चिवट तंतू ६२. इंद्राने मारलेला राक्षस ६३. साद ६४. मनुष्य, पुरुष ६६. शंकराचे वाद्य ६७. या एकादशीनंतर चातुर्मास सुरू होतो ७०. रस्ता ७२. अयोध्या ७४. थंडी, गारठा ७५. ओढाताण, खेचाखेच ७६. अनिष्ट घटनेचे सूचक, अपशकुन ७७. चक्रवाक पक्षी ७९. स्त्रियांचा वस्त्रविशेष ८०. मांजर (बालकांच्या भाषेत) ८१. गावाची हद्द, शीव ८२. कांचन, कनक ८३. आभाळ ८५. हिरमोड, आनंदावर पाणी पडणे ८७. चिखल/कचरा ८८. खरेपणा ९०. स्त्रियांचा एक कंठालंकार ९१. गूढ ९४. अश्वशाळा ९५. शीर्षक ९६. मुलाची/मुलीची मुलगी ९७. वापरात नसलेली जमीन ९८. निष्कारण १००. शाई १०१. पातळ बांबू चिरून केलेली काठी १०२. मच्छर १०३. सत्तावीसपैकी सातवे नक्षत्र १०४. आरंभीचा १०५. चिमटा, धनुष्य १०७. सूर्य १०८. लाळघोटेपणा १०९. एक दिवस जेवण व एक दिवस लंघन याप्रमाणे केलेले व्रत

**उभे शब्द –**

१. माणूसकीशून्य कृत्य २. खरे ३. सातूचा पेंढा जाळून केलेला औषधी क्षार ५. रक्तिमा ६. तुच्छ ८. अभिवादन ९. क्षपणक १०. शांतता १३. राहुटी, तंबू १५. सलामत १६. फुटाणे १७. पेटणे १८. अभिनेता १९. पायताण २१. पक्षी २२. उसाचा रस काढल्यावर उरलेला चोथा २३. दामिनी, वीज २४. माज २६. म्हैस २७. बिजली २९. मासे पकडण्याचे जाळे ३१. भाताचा एक प्रकार ३३. रव्याचा न्याहारीतला पदार्थ ३५. मुद्दाम, हेतूतः ३७. घुंगरू ३९. भांडखोर स्त्री ४०. हरीण ४२. फळाच्या अपेक्षेने केलेले सत्कर्म ४५. गचांडी ४६. नाचणी ४८. कपोत ४९. स्वर ५०. विद्यावेतन, स्कॉलरशिप ५१. भ्रमराची गुणगुण ५३. परीट ५४. सूर्य ५६. कृष्णाचे वडील ५७. सैनिकांची/पोलिसांची परेड ५८. भोंगा ६१. कष्टमय ६३. बाजार ६५. पृथ्वी ६८. कौरवांचा मामा ६९. बेचव, रसहीन ७०. उशीर ७१. पश्चिमेच्या देशातले ७३. गोड बोलून विश्वासघात करणे ७४. तुच्छतेची वागवणूक ७८. खळबळजनक ७९. तात्पर्य ८०. एक भयानक जलचर ८४. वांग्यांच्या भाजीचा एक प्रकार ८६. ब्रॉंझ धातू ८७. गवई ८८. आप्त ८९. तमोगुणी ९२. यज्ञ ९३. शासनाचे कररूपाने उत्पन्न ९४. साखरेचा रस ९७. मुक्काम ९९. श्रीफळ, माड १००. मदिरा १०३. मुलगा १०४. जुन्या रुपयातला सोळावा भाग १०५. वेदांची संख्या १०६. आगमन •

**नवाकाळ कोडे क्रमांक १०७६ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. सत्य २. मुकादम ५. श्रीनिवास ९. अमोघ ११. लळा १२. गाढव १४. बजबजपुरी १५. जनक १७. कव १८. टच २०. आब २२. तबला २४. लेणे २५. बुडखा २६. शिखर २८. गर ३०. पहिला ३२. पत ३३. तडाखा ३५. दग्धतिथी ३६. तिठा ३८. शीण ३९. अपराध ४१. कोंब ४२. सावज ४४. कन्या ४५. डवरणे ४७. दहन ४९. खलास ५२. धुपाटणे ५३. सलील ५५. सामील ५६. कोंडमारा ५८. सल ५९. वारण ६०. कांब ६१. साफा ६३. वाद ६४. जिणे ६५. रोगराई ६७. तारका ६९. यदा ७१. कढत ७३. दैव ७४. शांत ७५. रमल ७६. देवकी ७८. गराडा ८०. रममाण ८२. काशी ८३. सर ८५. पवन ८६. जेता ८९. इमारत ९१. मासा ९३. यंदा ९४. चवळी ९५. लज्जा ९६. फाया ९८. लवलेश ९९. रघुपती १०२. अवगत १०५. बलभद्र १०६. नवनीत १०७. डिझेल १०९. सिंहगड १११. सचैल ११२. आतप ११३. साधू ११४. अतीव

**उभे शब्द** : १. सतेज २. मुळा ३. दगावलेला ४. मढ ६. निशा ७. सबब ८. लांब ९. अपुरा १०. मोरी ११. लकब १३. वट १६. नत १९. चबुतरा २०. आखात २१. सारथी २३. लापशी २६. शिखा २७. रदबदली २८. गतिमान २९. प्रतिसाद ३१. हिणकस ३२. पपई ३४. डाफरणे ३७. ठाव ४०. धडपा ४३. जखमी ४६. वटवणे ४८. हलवाई ५०. लालसा ५१. गोडवा ५२. धुरा ५३. सलग ५४. प्राणघातक ५५. साबरमती ५७. मादक ५८. सरोवर ६०. कांतार ६२. फायदेशीर ६४. जितराप ६६. राजमाता ६८. काल ७०. दाव ७२. ढग ७७. कीस ७९. डावललेला ८१. मजेदार ८२. कामाक्षी ८४. रमा ८७. अवतीभवती ८८. दिलखुलास ९०. तफावत ९२. साल ९४. चपल ९७. याग १००. घुबड १०१. अनल १०२. अनीन १०३. तडित १०४. मोह १०८. झेप १०९. सिंधू ११०. गर्व

## पाकिस्तानवर तिरंगा फडकवू

पान १ वरून – पराभव करून तिथेही आपला तिरंगा फडकवू शकू. फडणवीस पुढे म्हणाले की बटेंगे तो कटेंगे याचा अर्थ मोदींनीदेखील सांगितला आहे. आज ३५० जाती मिळून ओबीसी घटक आहे. ओबीसी आहेत म्हणून एक ताकद आहे. तो ओबीसी ३५० जातींमध्ये विखुरला गेला तर ताकद राहणार नाही. आदिवासी, अनुसुचित जाती जमाती ही एक म्हणून ताकद आहे. त्यात ५४ जाती आहेत. त्या वेगळ्या झाल्या तर काय होईल? मी मोदींच्या 'एक है तो सेफ है' या घोषणेला महामंत्र म्हणतो. हा संपूर्ण समाजाला एकत्र ठेवण्यासाठी दिलेला मंत्र आहे. आपण एकत्र राहिलो तरच आपला विकास होईल असा त्याचा अर्थ आहे. कॉंग्रेस मात्र आपल्याला वेगळे करण्याचा प्रयत्न करत आहे, असे फडणवीस म्हणाले.

## सोयाबीनला ७ हजार रुपये भाव देणार महाविकास आघाडीकडून मोठे आश्वासन

**राहुल गांधी यांची पोस्टद्वारे माहिती**

नवी दिल्ली

**राज्यात** महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर सोयाबीन ७ हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव अधिक बोनस देऊन खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या समाजमाध्यमावरील पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे.

या पोस्टद्वारे राहुल गांधी यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला असून, राज्यातील महत्त्वाच्या पिकांबाबत निश्चित धोरण करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. गेल्या काही दिवसांपासून कांद्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. सध्या बाजारात व्यापाऱ्यांकडील कांदा असल्याने तो चढ्या दरात विकला जात असून, शेतकऱ्यांना त्याचा काहीही फायदा होत नाही. याचाच विचार करून कांद्याचा दर निश्चित करण्यासाठी एक समिती नेमण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. मविआ सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांच्या कापसालाही हमीभाव देणार असल्याचे राहुल गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. भाजपावर टीका करताना राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, भाजपा गेल्या तीन निवडणुकांमध्ये सोयाबीनला ६००० रुपये हमीभाव देण्याचे आश्वासन देत असून, प्रत्यक्षात शेतकऱ्याला आपले सोयाबीन केवळ ३ ते ४ हजार रुपयात विकण्याचा नाईलाज झाला आहे.

## अखेर अमित शहांच्या बॅगेचीही तपासणी झाली

पान १ वरून
अधिकाऱ्यांनी केली होती. दोन ते तीन वेळा उद्धव ठाकरे यांच्या बॅगेची तपासणी झाल्यावर उद्धव ठाकरे यांनी याबाबत भाजपावर जोरदार हल्लाबोल केला होता. निवडणूक आयोगाचे अधिकारी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या बॅगेची तपासणी करणार का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. त्यानंतर लगेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि आता थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या बॅगेचीही निवडणूक आयोगाकडून तपासणी करण्यात आली.

याबाबत अमित शहा एक्स पोस्ट करत म्हणाले की, आज महाराष्ट्राच्या हिंगोली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी माझ्या बॅगांची तपासणी केली. भाजपाचा निष्पक्ष निवडणूक व्यवस्थेवर विश्वास आहे. आम्ही निवडणूक आयोगाच्या सर्व नियमांचे पालन करतो. आपण सर्वांनी निवडणूक व्यवस्थेला योगदान दिले पाहिजे आणि भारतात जगातील सर्वात मजबूत लोकशाही ठेवण्यासाठी आपले कर्तव्य बजावले पाहिजे.

## राशीभविष्य

शनिवार, दि. १६ नोव्हेंबर २०२४

संजय मनोहर

**मेष** – मनात योजलेल्या गोष्टींना पुष्टी देऊ शकाल. नोकरीत मानसिक अस्वस्थता वाढेल. मित्र, नातेवाईकांच्या कार्यात तुमचा हातभार लागेल.

**वृषभ** – अति धाडस अंगाशी येईल. अनोळखी व्यक्तीबरोबर झटकन विश्वास ठेवू नये.

**मिथुन** – घरातील जुन्या नव्या पिढीमधील ताणतणाव संपेल. मित्रांमुळे सोयीसुविधांचा लाभ मिळेल. संततीशी मतभेद होतील.

**कर्क** – आवश्यक ठिकाणी पैसा खर्च करावा. जवळचे प्रवास आनंद देतील. नोकरीत सहकाऱ्यांमुळे चुका होणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

**सिंह** – हातात पैसे आल्यामुळे आवश्यक असणाऱ्या गोष्टींची खरेदी करू शकाल. तरुणांना थोड्याशा कारणामुळे निराशा येईल.

**कन्या** – विशिष्ट कामासाठी तुमची वर्णी लागेल. वाढणारा खर्च व कौटुंबिक ताणतणाव यामुळे त्रस्तता जाणवेल. स्वतःच्या कृतीमध्ये समतोलता असणे फायद्याचे ठरेल.

**तूळ** – स्वतःचे मनोरथ व वस्तुस्थिती याचे भान येईल. नवीन नोकरीचे प्रयत्न उत्तम यश देतील. आर्थिक कामे मार्गी लागतील.

**वृश्चिक** – व्यवसायातील भागीदारीचे ताण कमी होतील. शेजाऱ्यांशी मतभेद टाळावेत. कागदपत्रे अपूर्ण असल्यामुळे होणारे काम लांबणीवर पडेल.

**धनु** – पैशाच्या व्यवहारात मध्यस्थी फायदा येईल. नोकरीत सहकाऱ्यांशी वादविवाद होतील. मालमत्तेच्या विषयासंबंधीत स्वतःच्या मतास प्राधान्य द्यावे.

**मकर** – पती-पत्नीमध्ये नाराजी निर्माण करणाऱ्या घटना घडतील. कौटुंबिक कारणामुळे कार्यकर्तृत्वावर परिणाम होईल. वैयक्तिक छंद, कला जोपासाल. सत्संग लाभेल.

**कुंभ** – प्रत्येक बाबतीत मागे राहण्याच्या प्रवृत्तीमुळे नुकसान होईल. दूरच्या प्रवासात गोंधळ निर्माण होईल. स्वतःबद्दलचा अवास्तव कल्पनांना थारा देऊ नये.

**मीन** – घरातील नाजूक प्रश्नांना हात घालताना बाकीच्यांचा निर्णय विचारात घ्यावा. मनाची अस्थिरता टाळणे गरजेचे राहील.

## पवार, फडणवीसांच्या सभेत पाऊस चांगला संकेत! दोन्ही नेत्यांचे मत



मुंबई

**उपमुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांची शिराळा मतदारसंघात सत्यजित देशमुख यांच्यासाठी, तर शरद पवार यांची इचलकरंजी येथे राहुल आवाडे यांच्यासाठी प्रचार सभा पार पडली. दोन्ही सभा चालू असताना अचानक पावसाने हजेरी लावल्याने अनेकांना २०१९ च्या निवडणुकीतील शरद पवारांची भरपावसात भिजून घेतलेली सभा आठवली. शरद पवार म्हणाले की, माझ्या जाहीर सभेचा व पावसाचा काहीतरी संबंध आहे. महाराष्ट्रात अनेकदा मी बोलण्यास उभे ठाकलो की, पावसाला सुरुवात होते. पावसातील ही सभा महाविकास आघाडीच्या भविष्यातील विजयाचे द्योतक आहे. मी भाषण सुरू केले की, पाऊस पडतो आणि त्यानंतर निकालही चांगला लागतो. मध्यंतरी देशाच्या लोकसभेची निवडणूक झाली. आता विधानसभेची होत आहे. या निवडणुकीत महाराष्ट्राचा कारभार कुणाच्या हातात द्यायचा याचा निकाल आपल्या सर्वांना घ्यायचा आहे. तर उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मी पावसात सभा घेत आहे. असे म्हटले जात आहे की, पावसात सभा घेतली की, सीट निवडून येतात. हा शुभसंकेत आहे. पण पाऊस पडो किंवा न पडो मतांचा पाऊस पडणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. वाकुर्डे बुद्रुकची योजना १९९५ मध्ये युती शासनाने आणली होती.

## साहित्य संमेलनासाठी सवलतीत रेल्वे देण्यास रेल्वेमंत्र्यांचा नकार

पुणे

**अखिल** भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सरहद पुणे आयोजित ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा २१/२२/२३ फेब्रुवारी २०२५ रोजी दिल्लीत होत आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याच्या पार्श्वभूमीवर हे संमेलन दिमाखात व्हावे असे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, संमेलनासाठी पुणे ते दिल्ली सवलतीच्या दरात विशेष रेल्वे देण्यास रेल्वे मंत्र्यांच्या कार्यालयाने नकार दिला आहे. साहित्य संमेलनाला जाण्यासाठी पुणे ते दिल्ली विशेष रेल्वे गाडी सवलतीच्या दरात मिळावी, यासाठी सरहद संस्था दीड महिन्यांपेक्षा अधिक काळ रेल्वे मंत्रालयाकडे प्रयत्न करीत आहे. पुण्याचे खासदार आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत.

## संभाजीनगरमध्ये १९ कोटींचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त

छत्रपती संभाजीनगर

**निवडणूक** आयोगाच्या भरारी पथकाने आचारसंहिता काळात छत्रपती संभाजीनगर-जळगाव रोडवर कारवाई करून १९ कोटींचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले. काल सायंकाळी सिल्लोड फाट्यावर असलेल्या चेकपोस्टवर हा मुद्देमाल जप्त करण्यात आला. हे दागिने जळगाव येथील एका नामांकित ज्वेलर्सचे असल्याची माहिती आहे. हे सोने - चांदी सध्या जीएसटी विभागाच्या ताब्यात देण्यात आले आहेत.

## पुण्याच्या हडपसरमध्ये इमारतीला भीषण आग

पुणे

**पुण्याच्या** हडपसर येथील वैभव टॉकीजजवळील ३ मजली इमारतीला आज सकाळी भीषण आग लागली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या आगीत तिसऱ्या मजल्यावर २ जण अडकले होते. स्थानिकांनी त्या दोघांना इमारतीच्या गॅलरीमधून बाहेर काढले. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर जवानांनी पाण्याचा मारा करत या आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.


**क्लिओ इनफोटेक लिमिटेड**

सीआयएन : L65990MH1992PLC067450

नोंद.कार्यालय: कार्यालय क्र.९०१/९०२, ९वा मजला, अटलांटा सेंटर, उद्योग भवन समोर, सोनावाला रोड, गोरेगाव पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत - ४०००६३.

**३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाही व अर्धवर्षाकरिता स्वतंत्र अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचा अहवाल**

(रु.लाखात)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेले अर्धवर्ष | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०९.२०२४ | ३०.०६.२०२४ | ३०.०९.२०२३ | ३०.०९.२०२४ | ३०.०९.२०२३ | ३१.०३.२०२४ |
| | | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| १ | कार्यचलनातून एकूण उत्पन्न | ६.३१ | ५.०४ | १०.७० | ११.३५ | १६.३१ | ३१.२८ |
| २ | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) आणि अपवादात्मक /विशेष साधारण बाब) | १.६९ | २.५३ | (३.५३) | ४.२२ | (८.२४) | १.९८ |
| ३ | करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) आणि अपवादात्मक /विशेष साधारण बाब) | १.६९ | २.५३ | (७.९६) | ४.२२ | (१७.०३) | १.९८ |
| ४ | कालावधीकरिता एकूण सर्वंकष उत्पन्न | १.६९ | २.५३ | (७.८५) | ४.२२ | (१६.७४) | २.५१ |
| ५ | भरणा केलेले इक्विटी भाग भांडवल (दर्शनी मूल्य प्रत्येकी रु. १०/-) | ११०१.१० | ११०१.१० | ११०१.१० | ११०१.१० | ११०१.१० | ११०१.१० |
| ६ | उत्पन्न प्रति इक्विटी भाग - मूळ | ०.०२ | ०.०२ | (०.०७) | ०.०४ | (०.१५) | ०.०२ |
| ७ | उत्पन्न प्रति इक्विटी भाग - सौमिकृत | ०.०२ | ०.०२ | (०.०७) | ०.०४ | (०.१५) | ०.०२ |

टिप :-
१. ३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध्या वर्षाचे वित्तीय विवरण कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ आणि इतर मान्यताप्राप्त लेखा अंतर्गत विहित कंपनी (भारतीय लेखा मानक) नियम, २०१५ (इंड.एएस) नुसार लागू मर्यादेपर्यंत पद्धतीने तयार केले गेले आहे.
२. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीसाठी वरील अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षाचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले आहे आणि गुरुवार, १४ नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता दिली आहे.
३. ३० सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीकरिता कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष कंपनीच्या वेबसाइट https://clioinfotech.in वर उपलब्ध आहेत.
४. आवश्यक तेथे मागील कालावधी/वर्षाचे आकडे पुन्हा एकत्र केले गेले आहेत. त्रैमासिक आणि सहामाहीकरिताचे वित्तीय निष्कर्षाचे संपूर्ण स्वरूप https://clioinfotech.in वर उपलब्ध आहे.

क्लिओ इन्फोटेक लिमिटेडकरिता
सही/-
जीग्नेशकुमार देवगानिया
कंपनी सचिव

दिनांक: १४.११.२०२४
ठिकाण: मुंबई



**जाहीर नोटीस**

शिव-शक्ति एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्यादित, पत्ता- मौजे - मोगरा येथील न.भू.क्र. ३६४अ, ३७१ड, आणि ३७२(पै), अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००९३ या संस्थेचे असलेल्या वा संस्थेच्या इमारत बी-विंग मधील सदनिका क्र. ७१५ धारण करणाऱ्या **श्री. मनजी भगवान चौहाण** यांचे तारीख **१५/०२/२०१५** रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/ मालमत्तेचे असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/ हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागविण्यात येत आहेत. तसेच मृत व्यक्तीची पत्नी/मुले/मुली **श्रीमती मनजी भगवान चौहाण** (पत्नी) यांनी केलेल्या दाव्यानुसार/अर्जानुसार वरील सदनिकेचा संपुर्ण मालकी अधिकार त्यांच्या नावे हस्तांतरीत करण्यात यावे, असा दावा दाखल केलेला आहे. वरील सदनिकाचे हक्कदार/ वारसदार **श्रीमती सविता मनजी चौहाण** यांच्या व्यतिरिक्त जे कोणी सदनिका क्र. ७१५ च्या हक्काचा दावा करीत असेल तसा लेखी अर्ज व सोबत ठोस पुराव्यासहीत ही नोटिस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांचा व हरकतीच्या पृष्टर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहिल. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या/हरकत सादर झाल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यकारी करण्यात येईल. नोंदी व उपविधिची एक प्रत मागणीदारास/ हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात प्रशासक/अध्यक्ष/सचिव यांचेकडे सकाळी ११:०० ते संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

सही/-
**आनंदा वि. पाटील**
शिव-शक्ति एसआरए गृहनिर्माण संस्था, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०००९३

ठिकाण: अंधेरी (पूर्व) मुंबई-४०००९३.
दिनांक : ०६/११/२०२४



**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that (1) Mr. Yogesh Daulatrai Mehta, (2) Mrs. Varsha Yogesh Mehta, (3) Mrs. Vaishakhi Omar Traynor, (4) Ms. Deval Yogesh Mehta and (5) Mr. Achalesh Govind Pandya are the only bonafide trustees of Sheth Naranji Tulsidas Charitable Trust (**"the said Trust"**), having Registered No. P.T.R. No. A-1788 (Mumbai) registered under the Bombay Trust Act, 1950 with the Office of the Charity Commissioner, Mumbai and one Mr. Gaurang Girish Acharya was duly expelled from the trusteeship of the said Trust vide Resolution passed by the aforesaid trustees of the said trust in its meeting dated 27.09.2023 with immediate effect and accordingly a Change Report bearing No. 7153 of 2023 was filed by the said Trustees of the said Trust on 29.12.2023 with the Ld. Charity Commissioner, Mumbai. Despite the expulsion of Mr. Gaurang G. Acharya from the said Trust, he has been continuously misrepresenting the public at large that he is a Trustee of the said Trust and has been illegally and unlawfully acting in his capacity as a Trustee of the said Trust and further creating third party rights in respect of the properties and assets of the said Trust includings units in the Trust's buildings behind the back of the aforesaid Trustees. Any person, individual, firm, company entering into any sort of agreement/s with Mr. Gaurang G. Acharya for purchase or lease or rent or leave and license or tenancy or any other transaction whatsoever in respect of the properties and/ or units of the said Trust shall restrain himself / itself/ themselves from entering into any such transaction/s without prior written consent and permission from the aforesaid trustees of the said Trust and if any such transactions shall be found the same shall be deemed to be illegal, void ab initio, null and void and not binding upon the said Trust. Further, it is hereby informed to the public at large that any agreement/s of any nature whatsoever such as Tenancy Agreements / Leave and License Agreements / Sale Agreements / Lease or by whatever name called entered into by the said Mr. Gaurang G. Acharya with third parties in respect of any of the properties of the said Trust after the date of the said resolution dated 27.09.2023 thereby expelling him from the said Trust are deemed to be illegal, void ab initio, null and void and not binding upon the said Trust and such persons who have obtained any rights whatsoever in the said trust properties from the said Mr. Gaurang G. Acharya shall immediately approach the authorized trustee Mr. Yogesh D. Mehta having his mobile number hereinbelow.

Dated this **16th** day of **November, 2024.**

Sd/-
For **Sheth Naranji Tulsidas Charitable Trust**
1/12, Moti Mansion, 5th Khetwadi Lane, Mumbai- 400004
Mobile: Yogesh D. Mehta- 9322644366

